CMYK



अंगारकी चतुर्थी

चंद्रोदय : रात्री ९.१० मि.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर


सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.१० जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १०५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८



**इंद्रभुवन उजळले**

स्मार्ट सिटी योजनेतून सोलापूर शहराचा कारभार चालणाऱ्या इंद्रभुवन इमारतीची दुरुस्ती करण्यात आली असून त्यावर नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. ही इमारत लख्ख लख्ख प्रकाशाने उजळली आहे.



## असाही गौरव आरएसएस कौरव



# सावरकरांनंतर संघावर, राहुल बरसले मोदींवर

✔ सुराज्य/सोलापूर

**भाजपच्या काँग्रेसमुक्त भारत मोहिमेला मुँहतोड जवाब देण्यासाठी काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी 'भारत जोडो' यात्रेत सोमवारी सत्ताधाऱ्यांचा वेगळ्याच भाषेत गौरव केला. 'महाभारत काळातील कौरव आजही अस्तित्वात असून ते हाफ पँट वापरतात आणि त्यांच्या हातात काठी असते' अशी टिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केली आहे. आधी सावरकरांवर आणि आता संघावर बोलणारे राहुल गांधी नेहमीप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही बरसले आहेत.**

### २१ व्या शतकातले कौरव

महाभारत कालीन कौरवांना पाहण्यासाठी आज कुठेही जाण्याची आवश्यकता नाही. २१ व्या शतकातले कौरव हे हाफ पँट घालतात. त्यांच्या हातात काठी असते. देशातले दोन ते तीन अब्जाधीश लोक या कौरवांच्या बाजूने आहेत, अशा शब्दात राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नाव न घेता टिका केली.

### हरहर महादेव... नव्हे जय श्रीराम...

भगवान शंकर हे तपस्वी होते. त्यांच्या तपस्येवर हल्ला करण्यासाठी आधुनिक कौरव हे हरहर महादेव अशी घोषणा देत नाहीत. त्यांनी 'जय सीताराम' या घोषणेतून सीतामातेला शिताफीने वगळले. 'जय श्रीराम' ही नवीन घोषणा तयार करून देशात दहशत पसरवली, असा आरोप करत हे लोक भारतीय संस्कृतीविरोधक असल्याची टिका केली.

### कुणासाठी? अब्जाधीशांसाठी...

नोटबंदी कुणी केली? जीएसटी चुकीच्या पद्धतीने कुणी आणली? हा खटाटोप कुणासाठी केला? नोटबंदी आणि चुकीच्या पद्धतीची जीएसटी मोदींनी आणली नसून त्यांच्यासोबत असलेल्या दोन-तीन अब्जाधीशांनी त्यांना भाग पाडले. हे तुम्ही मान्य करा किंवा करू नका, मात्र हेच सत्य आहे, असे राहुल गांधी यांनी ठणकावून सांगितले.

गेल्या ११२ दिवसांपासून सुरू असलेली राहुल गांधी यांची 'भारत जोडो यात्रा' सध्या हरियाणामध्ये आहे. यात्रेदरम्यानच सोमवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी त्यांनी संघाला टीकेचे लक्ष्य बनवले. संघावर टिका करून न थांबता त्यांनी पुन्हा एकदा मोदींवर आणि मोदीभक्तांवरही प्रहार केले. त्यामुळे ही यात्रा पुन्हा एकदा चर्चेचा केंद्रबिंदू बनली आहे.

## माजी नगरसेवक गंगेकरांवर गुन्हा दाखल


✔ सुराज्य/पंढरपूर

मागील भांडणाचा राग मनात धरून माजी नगरसेवक प्रताप गंगेकर याने अनिल नगर येथे एकास जबर मारहाण केली असून घटनेनंतर गंगेकर फरार आहे. प्रशांत अप्पा चौरे यांनी या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, रविवारी सायंकाळी प्रशांत चौरे व विनायक सोनटक्के हे अनिल नगर येथील म्हसोबा मंदिरा जवळ गप्पा मारत असताना प्रताप गंगेकर व सागर लऊळकर हे त्या ठिकाणी आले.

यावेळी गंगेकर याने चौरे यांना शिवीगाळ सुरू केली. तसेच गंगेकर याने तुम्ही गल्लीतील लोक लय माजलाय, निवडणूक होऊ द्या तुम्हाला एकेकाला गाठून खलास करतो अशी धमकी दिली. चौरे यांनी दमदाटी का करता असे विचारले असता सागर लऊळकर याने हातातील लोखंडी कडे चौरे यांच्या गालावर मारले तर गंगेकर याने जवळच असलेल्या घराच्या पत्र्यावरील लाकडी दांडके काढून चौरे यांच्या नाका तोंडातून रक्त येईपर्यंत मारहाण केली. दरम्यान सदर भांडण सोडवण्यासाठी चौरे यांची बहीण संगीता विलास साखरे मध्ये आली असता तिला देखील गंगेकर याने ढकलून दिले. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात प्रताप गंगेकर व सागर लऊळकर या दोघांविरोधात गुन्हा दाखल केला असून दोन दिवसापासून पोलीस त्यांना अटक करण्यासाठी शोध घेत आहेत. दरम्यान यापूर्वी देखील गंगेकर याच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले होते.

## तरूणीची नीरा नदीपात्रात उडी टाकून आत्महत्या

✔ सुराज्य/अकलूज



प्रेम संबंधातील त्रासाला कंटाळून एका युवतीने १९ वर्षीय तरुणीने निरा नदीच्या पात्रात उडी टाकून आत्महत्या केल्याची घटना रविवार सकाळी १० च्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी युवतीचा आत्येभाऊ याने दिलेल्या फिर्यादीवरून अकलूज पोलिसांनी हर्षद अप्पा घोंगडे (वय ३० रा. आझाद चौक अकलूज) या शिक्षकाला अटक करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला. त्याला दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश माळशिरसच्या न्यायालयाने सोमवारी दिला.

याबाबत अकलूज पोलिसाकडून मिळालेल्या माहिती नुसार हर्षद घोंगडे याचे त्यांच्या घरा शेजारी राहणाऱ्या चंचल चव्हाण या तरुणाबरोबर प्रेम संबंध होते. गत ४ महिन्यापूर्वी त्यांचे प्रेम प्रकरण युवतीच्या घरच्यांना कळाल्यावर मुलीच्या घरच्यांनी मुलाला मुलीशी प्रेमसंबंध ठेवू नको असे सांगितले होते. त्यावेळी हर्षद घोंगडे याने प्रेमसंबंध ठेवणार नाही असे सांगितले होते. परंतु प्रेमसंबंध पुढे चालू राहिले. काल रविवारी पहाटे ३ च्या सुमारास चंचल आणि हर्षद या दोघांमध्ये भांडणाचा आवाज ऐकू आल्याने मुलीचे भाऊ घटनास्थळी आले होते. त्यावेळी हर्षद हा पळून गेला. त्यानंतर भावाने चंचलला घरी आणून सोडले होते. सकाळी चंचल ही घरातून गायब झाल्याचे दिसून आले. त्यानंतर सकाळी १०:३० च्या सुमारास निरानदीच्या शनी घाटाजवळ चंचल चव्हाण हिचा मृतदेह पाण्यात आढळून आला.

मुलीने नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचे कळाल्यावर मुलीचा आत्येभाऊ मनोज संजय साळुंखे (वय २५, रा.आझाद चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अकलूज पोलिसांनी हर्षद घोंगडे याच्यावर भादवि कलम ३०६ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. आरोपी हर्षद घोंगडे हा टेंभुर्णी येथे शिक्षक असल्याचे पोलिसाकडून सांगण्यात आले. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक सुनील जाधव हे करीत आहेत.

## आज भारत विरुद्ध श्रीलंका वनडे सामना

✔ **गुवाहाटी :** भारत आणि श्रीलंका यांच्यातील ३ वनडे मालिकेतील पहिला सामना आज अर्थात १० जानेवारी रोजी गुवाहाटी येथे होणार आहे. भारतीय संघाचा नियमित कर्णधार रोहित शर्मा या मालिकेतून पुनरागमन करत आहे. रोहित शर्माने गुवाहाटी वनडेपूर्वी पत्रकार परिषदेत विविध प्रश्नांची उत्तर दिली. यावेळी पहिल्या एकदिवसीय सामन्यात ईशान किशनला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळणार नसल्याचे रोहित शर्माने स्पष्ट केले. ईशान किशनच्या जागी संघ व्यवस्थापनाने शुभमन गिलवर विश्वास व्यक्त केला.

## घरात घुसून महिलेचा विनयभंग; आरोपीला ३ वर्षे सक्तमजुरी

✔ सुराज्य/सोलापूर

एका विधवा महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याच्या आरोपावरून कल्याण मनोहर ऊर्फ बिट्टू शिरसट (रा.मोहोळ) याला ३ वर्षे सक्त मजुरी आणि दंडाची शिक्षा विशेष न्यायाधीश कविता डी. शिरभाते यांनी सोमवारी सुनावली. पतीच्या निधनानंतर ती महिला आपल्या दोन्ही मुलासह माहेरी राहण्यास होती. आरोपी कल्याण शिरसाट (रा.मोहोळ) हा रस्त्यात अडवून तिला धमकी देत होता. रात्रीच्या सुमारास ती महिला मुलासह घरात झोपली होती.

दरवाजावर दगड पडल्याचा आवाज आला. त्यामुळे तिने दरवाजा उघडला. तेव्हा आरोपीने घरात घुसून तिच्याशी असभ्य वर्तन केले होते. या घटनेची फिर्याद पीडित महिलेने २०१७ साली मोहोळ पोलिसात दाखल केली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी आरोपी विरुद्ध



घरात घुसून विनयभंग केल्याचा गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाचा तपास तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी अभय डोंगरे यांनी करून आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. मूळ फिर्यादीची साक्ष आणि सरकार पक्षाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने कल्याण मनोहर शिरसट याला ३ वर्षे सक्त मजुरी आणि दंडाची शिक्षा सुनावली. दंडाच्या वसूल रकमेतून ४ हजार ५०० रुपये पीडित महिलेस नुकसान भरपाई देण्याचेही आदेशात नमूद आहे. या खटल्यात सरकारतर्फे ॲड. शीतल डोके,ॲड. प्रकाश जन्नू तर आरोपीच्या वतीने ॲड. के.एन.खडके यांनी काम पाहिले.

## मोहोळ नगरपरिषदेतून ३५ हजार गायब

✔ सुराज्य/मोहोळ





मोहोळ नगर परिषदेच्या कार्यालयातून मागील आठ दिवसापूर्वी वसुलीच्या पैशातील ३५ हजार रुपये गायब होऊनही याबाबत वरिष्ठांनी दखल न घेतल्याने ना दाद ना फिर्याद अशी परिस्थिती संबंधित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत झाली आहे.

याबाबतची माहिती अशी की संगीता कुंभार ह्या मोहोळ नगर परिषदेमध्ये काम करतात नगर परिषदेच्या ऑफिसमधील उतारे देणे त्याचबरोबर घरपट्टी पाणीपट्टीची वसुली करणेयासारखी कामे द्या नियमित करत असतात ४ जानेवारी रोजी बुधवारी वसुली करून आल्यानंतर ऑफिसमध्ये भरणा करण्यासाठी थांबल्या त्याचबरोबर पसे मध्ये पैसे ठेवून बाकिची कामे ही त्यांनी केली त्यानंतर त्यांनी ठेवलेले पैसे भरणा करण्यासाठी काढले असता त्यामध्ये त्यांनी मोजून लावून ठेवलेल्या नोटांमधून ३५ हजार रुपये कमी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत तातडीने ही बाब त्यांनी त्यांच्या वरिष्ठांच्या कानावर घातली वरिष्ठांनी या घटनेची शहानिशा न करता याबाबत विचारपूस न करता त्यांनाच पूर्ण रक्कम भरण्याची तंबी दिली. त्यांनी बाहेरून ३५ हजार रुपये आणून त्या रकमेची पूर्तता केली व त्या दिवशीचा भरणा पूर्ण केला परंतु नंतरच्या कालावधीमध्ये आठ दिवसांमध्ये कार्यालयामध्ये चोरी होऊन वरिष्ठांनी याबाबत कोणतीही दखल घेतली नाही कार्यालयामध्ये सीसीटीव्ही असतानाही भर दिवसा होणाऱ्या चोरीची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे या घटनेबाबत मोहोळ येथील नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे ३५ हजार रुपये भर दिवसा पर्समध्ये काढून घेऊनही नादातला फिर्याद अशी संगीता कुंभार यांची अवस्था झाली आहे ही घटना त्यांनी स्वतः प्रतिनिधीशी संपर्क साधून या घटनेबाबत न्याय मिळवण्याची मागणी केली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'ती' राहिली बाजूला,
यांचेच झाले सुरू...!!!

| कल्याण |
|---|
| -------- |

| मेन बाजार |
|---|
| -------- |

# जिल्हा नियोजन समितीचा ७० टक्के निधी खर्च

## मार्चअखेर निधी खर्च करण्यासाठी लगबग, १३ जानेवारीला पालकमंत्री घेणार आढावा

✔ सुराज्य/सोलापूर

**जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ च्या कार्यान्वयनास झालेला विलंब, लवकरच होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका त्यामुळे लागणारी आचारसंहिता या आचारसंहितेच्या कचाट्यात विकास कामांना फटका बसू नये म्हणून मार्च अखेरपर्यंत निधी खर्च करण्यासाठी जिल्हाप्रशासनामध्ये लगबग चालू आहे. नियोजन समितीचा आता पर्यंत फक्त ७० टक्के निधी खर्च झाला आहे. मिळालेला निधी यंत्रणांनी गांभीर्याने व विहित वेळेत खर्च करावा. प्रशासकीय मान्यता देऊ निधी देण्यासाठी यासाठी १३ जानेवारी रोजी पालकमंत्री सोलापूर दौऱ्यांवर येत असून जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ आढावा घेणार आहेत.**

जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली २३ डिसेंबर रोजी नियोजन भवन येथे आढावा घेण्यात आला. या बैठकीस पोलीस आयुक्त शिरीष सरदेशपांडे, प्रभारी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तर यापूर्वी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित मुद्यांचे कार्यपालन अहवालांबाबत आढावा घेण्यात आला होता तसेच जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२३-२४ करिता प्रारूप आराखडा तयार करण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीचा आढावा यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला होता. जिल्हा नियोजन समिती एकूण निधी ५२७ तर दावित्व १३७ कोटींचे आहे. जिल्हा परिषेदला १७० कोटी तर दावित्व ४२ कोटींचे आहे. जिल्हा नियोजन समितीकडून आता पर्यंत ३५७ तरतूद तर




९६ कोटींचे दावित्व आहे. त्यापैकी ९५ कोटी जमा झाले आहे. ५३ कोटींच्या प्रशासकीय मान्यता दिल्या आहेत. तर १८ कोटींचा आता पर्यंत खर्च झाले आहेत. इतर योजनेच्या माध्यमातून जिल्हा नियोजन समितीसाठी २१४ कोटी मिळाले आहेत. ७७ कोटी दावित्व आहे. ९२ कोटींच्या प्रशासकीय मंजुरी देण्यात आल्या आहे. यांचे प्रमाण ७० टक्के आहे. ३५७ कोटी प्राप्त झाले होते.

आता पर्यंत प्राप्त तरतुदी नुसार ६० टक्के म्हणजे ३५७ कोटी मिळाले होते त्यापैकी ८८ कोटींचे वितरण झाले आहे. तर ७३ कोटी खर्च झाले आहे. यांचे खर्चाचे प्रमाण ९० टक्के आहे. सोलापूर जिल्ह्यातील आमदार निधीतून ५६ टक्के निधी मिळाला आहे. ३३ कोटी प्राप्त झाले आहेत. त्यापैकी २५ कोटी खर्च झाले आहे हे खर्चाचे प्रमाण ७४ टक्के आहे. कोट्यावधींच्या प्रशासकीय मान्यता देऊन तयार आहेत. याला मान्यता मिळण्यासाठी १३ जानेवारीच्या आढावा बैठकीत ठेवल्या जाणार आहे. सर्व निधी मार्च अखेर खर्च करण्यासाठी ही लगबग जिल्हा प्रशासनामध्ये चालू आहे.

CMYK

# जातगणनेची रणनीती

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी त्यांच्या राज्यात जातनिहाय जनगणनेला सुरुवात केली आहे. त्यांनी हे पाऊल उचलल्यानंतर अन्य राज्यांनाही जातनिहाय गणनेची आस लागून राहणार नाही, असे होऊ शकेल काय? बिहारने या जनगणनेची पायाभरणी केली तेव्हा आपल्या महाराष्ट्रात त्याचा मुहूर्त कधी सापडणार? असा सवाल उपस्थित केला जात असतानाच ओबीसींचे नेते छगन भुजबळ यांनी त्यासाठी पहिल्यांदा तत्परता दाखवली आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तातडीने पत्र धाडून राज्यातही अशी जनगणना व्हावी, अशा अशी मागणी केल्याने सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांचे कान टवकारले गेलेले असतील. नितीश यांनी हा खटाटोप का चालवला आहे यामागची कारणे वेगवेगळी आहेत. मुळात त्यांच्यासारख्या मुरब्बी नेत्यांना एका दगडात दोन पक्षी मारण्याची सवय असते. नितीश यांनी तेच केले आहे. जातनिहाय जनगणनेचा साऱ्यांनाच लाभ होईल, असा त्यांचा दावा असला तरी पडद्याआडची बाब वेगळीच आहे. नितीश आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी या माध्यमातून भाजपसमोर मोठे राजकीय आव्हान उभे केल्याचे मानले जात आहे. या मोहिमेचा नितीश-तेजस्वी यांच्या आघाडीला किती फायदा होतो वा भाजपला फटका बसतो का, याची उत्तरे आगामी लोकसभा निवडणुकीतच मिळतील. जनगणना ऐतिहासिक असल्याचे वर्णन यादव यांनी केले. भाजपचा याला विरोध असताना नितीश यांनी हा मार्ग स्वीकारून भाजपवर कुरघोडी केली आहे.राज्याचा विकास होईल, असे नितीश म्हणतात पण त्यांनी सत्य लपवले आहे. बिहारमध्ये नितीश यांच्या पायाखालची वाळू घसरलेली आहे हे



विधानसभा निवडणुकीत दिसून आले आहे. भाजप आपली सत्ता हिरावून घेणार, अशी चिन्हे दिसत असतानाच त्यांनी लालूप्रसाद यांच्या पक्षाशी हातमिळवणी करून पुन्हा सत्ता हस्तगत केली. आता तेजस्वी यादव नितीश यांना डोईजड होऊ लागले आहेत. त्यामुळे सत्तापिपासू नितीश यांना 'इकडे आड-तिकडे विहीर' अशी त्यांची अवस्था झाली आहे. केंद्रीय राजकारणात भाजपला पर्याय म्हणून विरोधकांच्या आघाडीचा प्रयोग फसला आहे तेव्हा नितीश यांना स्वतःच्या राजकीय अस्तित्वाची चिंता लागून आहे. आगामी काळात निदान जातींची ढाल पुढे करून जनाधार वाढवण्याचा नितीश यांचा या जनगणनेमागचा मनोदय आहे, यात शंकाच नाही. पण नितीश यांची ही रणनीती यादव यांना मान्य होईलच कशी? यादव यांची पुढची महत्त्वाकांक्षा वेगळीच आहे. सत्तासुंदरी त्यांना खुणावत आहे. तेव्हा नितीश यांना संपवण्याचा यादव यांचाही खेळ असणारच आहे. नितीश यांच्यानंतर आपल्या राज्यातील ओबीसी नेत्यांनाही स्वप्ने पडू लागली आहेत. राष्ट्रवादीचे नेते भुजबळमहाशयांनी या जनगणनेच्या मागणीचे पहिले पाऊल टाकून शरदरावांची शाबासकी घेतली. महाराष्ट्रातही जातिनिहाय जनगणना करावी, असा ठराव राज्य विधानसभेत मंजूर झाला होता. विधानसभेचे माजी अध्यक्ष नाना पटोले यांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता. राज्यात जातिनिहाय जनगणना झाल्यास ओबीसी समाज किती याची आकडेवारी समोर येईल, असे भुजबळ यांचे म्हणणे आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात जातिनिहाय जनगणनेचा ठराव करण्यात आला होता. कोरोनामुळे ते काम सुरू करता आले नव्हते. सरकारने ही जनगणना सुरू करावी, अशी भूमिका नाना पटोले यांनी मांडली आहे. पटोले हेही ओबीसी नेते आहेत. २०१४ पासून बिहारमध्ये भाजपने चांगलीच मुसंडी मारली होती. ओबीसी, अनुसूचित जाती व जमाती समाजाचा पाठिंबा मिळविण्यात भाजप यशस्वी झाला. २०१४ आणि २०१९ या दोन्ही लोकसभा निवडणुकीत बिहारमधील ४० पैकी ३० पेक्षा अधिक जागा मिळविण्यात भाजप व मित्र पक्ष यशस्वी झाले होते. २०२०च्या विधानसभा निवडणुकीत नितीश यांच्याबरोबर लढताना भाजपला अधिक जागा मिळाल्या होत्या. नितीश यांनी साथ सोडल्याने भाजपने २०२४च्या लोकसभा निवडणुकीची जुळवाजुळव सुरू केली आहे. जनगणनेचे काम मे अखेरपर्यंत चालणार आहे. त्याची आकडेवारी या वर्षाच्या अखेरीस किंवा २०२४च्या प्रारंभी जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत ओबीसी किंवा अन्य दुर्बल घटकांच्या मतदारांवर छाप पडू शकते, असे नितीश यांचे गणित असावे. केंद्रातील भाजप सरकारने जातनिहाय जनगणनेला विरोधच केला आहे. राज्यांना ती मुभा दिलीय. केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात शिंदे व फडणवीस सरकारमध्ये निर्णय घेतले जातात. यामुळे जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय लगेचच तरी शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात होणे कठीणच असल्याचे मानले जातेय.

## राज्य

# काश्मीरच्या अस्वस्थतेत दडलेल्या आर्थिक कारणांचा शोध

**काश्मीरकडे पहायचा दृष्टिकोन केवळ एक 'पर्यटन स्थळ' किंवा 'हिंदू-मुस्लीम संघर्षाचे केंद्र' आणि पाकिस्तानचा डोळा असलेला भूप्रदेश एवढ्या मर्यादित दृष्टिकोनातून पाहून चालत नाही. काश्मिरी पंडित आणि मुस्लीम यांच्यातला संघर्ष हा धार्मिकतेपेक्षा जास्त आर्थिक प्रश्नांभोवती केंद्रित झालाय. हे आपण समजून घ्यायला हवं. जम्मू-काश्मीर राज्याला लागू असलेले कलम ३७० आणि ३५-अ ५ ऑगस्ट २०१९ला रद्द करण्यात आले. एवढेच नाही तर जम्मू-काश्मीर आणि लडाख अशी विभागणी करून त्यांना केंद्रशासित प्रदेश घोषित करण्यात आले. यामुळे काश्मीरमधला दहशतवाद संपेल आणि त्या विभागाचा सर्वांगीण विकास होईल असा दावा केंद्र सरकारने केला होता.**

काश्मीरमध्ये गुंतवणूक करावी यासाठी देशात आणि जगभरातल्या उद्योजकांना आवाहनं करण्यात आली होती. अनेक शिक्षणसंस्था ते उद्योजकांनी काश्मीरमध्ये आपण रचनात्मक काम करू अशा घोषणाही केल्या होत्या. काश्मीरमधला दहशतवाद संपला असल्याच्या आणि अनेक जिल्हे 'दहशतवाद मुक्त' झाल्याच्याही बातम्या येत होत्या. याच पार्श्वभूमीवर कोरोनामुळे टाळेबंदी घोषित झाल्याने काश्मीरच नाही तर अवघ्या देशातली अर्थव्यवस्था धोक्यात आली. त्या भीतीच्या लाटेत काश्मीरमधल्या बातम्या आपसूक दबल्या गेल्या. तिथे सगळे आलबेल आहे आणि आता काश्मीर उंच भरारी घेण्याच्या तयारीत आहे या स्वप्नात लोक मशगूल राहिले.

नंतर आला 'काश्मीर फाईल्स' हा बहुचर्चित आणि वादग्रस्त सिनेमा. १९८९ला काश्मिरी पंडितांना काश्मीर खोरे सोडावे लागले, हिंसाचार झाला याचे एकतर्फी आणि अतिरंजित चित्रण असलेल्या या सिनेमाने काश्मीर चर्चेत आला खरा पण ती चर्चा सकारात्मक अंगाने नेण्यात अपयश आलं. कोणतीही परिस्थिती बहुअंगीय दृष्टीने पहावी लागते याचे भान सुटले. त्यामुळे काश्मीर नेमका काय आहे आणि तिथे असे का घडते याबाबतची चर्चा पाकिस्तान आणि हिंदू-मुस्लीम अशी धर्माच्या अंगानेच झुकलेली राहिली. याच परिस्थितीत काश्मीरमधला दहशतवाद आहे किंवा संपला आहे असे दावे फोल असल्याचंही पुढे आले.

### काश्मीर पुन्हा एकदा धुमसतोय

ऑक्टोबर २०२१ महिना हा काश्मीरसाठी पुन्हा रक्तरंजित ठरला. या महिन्यात विविध ठिकाणी झालेल्या हिंसाचारात एकूण ४४ लोक ठार झाले. त्यात १२ सुरक्षा दलाचे सैनिक, काश्मिरी पंडितांसह १३ सामान्य नागरिक आणि १९ दहशतवाद्यांचा समावेश होता. फुटीरतावाद्यांचे समर्थक आहात या आरोपाखाली शेकडो नागरिकांना जेरबंद करण्यात आले. त्यानंतर अतिरेक्यांनी नागरिकांना वेचून मारण्याची पद्धत अवलंबली.

एका काश्मिरी पंडिताची हत्या झाल्यानंतर दहशतवाद्यांच्या भीतीने ऑक्टोबर २०२२ मध्ये शोपिया जिल्ह्यातल्या दहा पंडितांच्या परिवारांनी खोऱ्यातून जम्मूमध्ये स्थलांतर केले. राजौरी जिल्ह्यातल्या डांगरी गावात दहशतवाद्यांनी गोळीबार करून हिंदू परिवारातल्या सहा व्यक्तींची निघृण हत्या केली तर सात व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्या. या हत्याकांडाच्या विरोधात शांतीमोर्चा काढला गेला तेव्हा बॉम्बस्फोटही करण्यात आला. या अशा विविध घटनांमागे आयएसआय किंवा लष्करे-तय्यबा या संघटनांचा हात आहे असे दावे सरकारकडून केले जात आहेत. एकंदरीत पुन्हा एकदा काश्मीर धुमसू लागला आहे याची ही दुश्चिन्हं आहेत.



### हिंदू-मुस्लीम संघर्षाची परिमाणे

कोणत्याही समाजाच्या वर्तमानाची बीजे इतिहासात दडलेली असतात. काश्मीरकडे पहायचा दृष्टिकोन केवळ एक 'पर्यटन स्थळ' किंवा 'हिंदू-मुस्लीम संघर्षाचे केंद्र' आणि पाकिस्तानचा डोळा असलेला भूप्रदेश एवढ्या मर्यादित दृष्टिकोनातून पाहून चालत नाही. काश्मीरचा इतिहास स्वातंत्र्यानंतर सुरू होत नाही. काश्मिरी पंडित आणि मुस्लीम यांच्यातला संघर्ष हा धार्मिकतेपेक्षा जास्त आर्थिक प्रश्नांभोवती केंद्रित झाला आहे याचे आकलन योजनाकारांना झाल्याचे दिसून येत नाही.

डोग्रा राजवट हिंदू असल्यामुळे काश्मिरी पंडितांचा प्रशासनात सर्वार्थाने प्रभाव होता. सर वाल्टर लॉरेन्स यांनी डोग्रा काळात काश्मिरी मुस्लीम कारागीर आणि शेतकऱ्यांचे किती भयंकर शोषण केले याचा अहवालच सादर केला होता. त्यानुसार 'काही पंडित अधिकारी व्यक्तिगत स्तरावर दयाळू आणि सभ्य असले तरी जेव्हा एकत्रित येत तेव्हा ते क्रूर आणि दमनकारी बनून जात.' गवाशानाथ कौल यांनी आपल्या 'काश्मीर देन एंड नाऊ' या पुस्तकात म्हटलंय की '९० टक्के मुस्लीम घरे ही पंडित सावकारांकडे गहाण आहेत. सरकारमध्ये मुस्लिमांचे प्रमाण नगण्य तर होतेच पण त्यांना सैन्यातही अधिकारपदं उपलब्ध केली गेली नव्हती.' एकंदरीत हिंदू डोग्रा राजवटीने काश्मिरी पंडितांच्या मदतीने तिथे मुस्लिमांचे दमनच केले. या काळात असंख्य मुस्लिमांनी पंजाब आणि नजीकच्या राज्यांमध्ये स्थलांतर करणे पसंत केले. १९३१चा उठाव डोग्रा राजवटीच्या विरोधात झाला. शेख अब्दुल्लांचे नेतृत्व यातूनच पुढे आले.

ऑक्टोबर-नोव्हेंबर १९४७ला जम्मू-काश्मीर तेव्हा भारतात सामील झालेले नव्हते तेंव्हा हिंदू आणि शीख जहाल गटांनी डोग्रा राजांच्या पाठबळावर दंगे केले, ज्यात हजारो मुस्लीम ठार झाले. आकडेवारी निश्चित नाही पण किमान २०,००० ते एक लाख असल्याचे विविध अंदाज आहेत. अनेक मुस्लीम पंजाबात पळून गेले. हिंदू-मुस्लीम यांच्यातल्या संघर्षाला अनेक परिमाणे आहेत पण ती भारतीय माध्यमांनी कधी विचारात घेतली नाहीत.

### राजकीय मंडळींचा भाबडा आशावाद

नागरिकांच्या असंतोषाला आर्थिक कारणे असतात हा जागतिक पातळीवर अनुभवाला येणारा सिद्धांत आहे. ज्या ३७० कलमाबाबत संघवादी नेहमीच आक्रमक राहिले होते त्यावरही जरा नजर फिरवली पाहिजे. काश्मीरचा राजा हरीसिंग आणि शेख अब्दुल्ला याच्या हट्टामुळे सामीलनाम्याच्या करारातल्या तरतुदींनुसार कलम ३७० अस्तित्वात आले. हा करार झाला १९४८चा तर घटना अस्तित्वात आली ती १९५० साली. या दोन वर्षाचा मधला काळ सोडला तर १९५० सालापासूनच भारत सरकारने शांत पण ठामपणे कलम ३७० दुर्बळ करायला सुरुवात केली.

केंद्र-राज्य संबंध ठरवताना जवळपास ९७ बाबी केंद्राच्या अखत्यारीत येतात. त्यापैकी केवळ चार बाबींबाबत ३७० नुसार केंद्राला अधिकार मिळालेले होते. पण १९५०ला भारत सरकारने राष्ट्रपतींचा अध्यादेश काढण्याचा अधिकार वापरत या वर्षीच केंद्र-राज्य संबंधांपैकी कायदे करण्याचे अजून ३८ अधिकार भारत सरकारने आपल्या अखत्यारीत घेतले. यासाठी राष्ट्रपतींचा अध्यादेश काढण्याचा अधिकार वापरण्यात आला तर जम्मू-कश्मीरमधल्या सरकारला तो मंजूर करायला भाग पाडण्यात आले. हेच १९५२ आणि ५४ला करून कलम ३७० चे दात काढण्याचं काम करण्यात आलं. ३७० रद्द करण्याच्या आधी केंद्राने ३७० मधले फक्त तीन अधिकार काश्मीरच्या हाती राहिले तर काश्मीरचे ३७०मुळे अस्तित्वात आलेले ९४ अधिकार केंद्राने पूर्वीच आपल्या ताब्यात घेतलेले होते. म्हणजे ५ ऑगस्ट २०१९ला भाजप सरकारने काश्मीरच्या अखत्यारीत उरलेले फक्त तीन अधिकार रद्दबातल ठरवले.

### घोषणा नको, काम हवं

३७० आणि ३५-अ रद्द झाल्यामुळे काश्मीर शांतीमय होईल हा आशावाद भ्रामक असल्याचं अलीकडच्या हिंसाचाराच्या वाढत्या घटनांवरून स्पष्ट होतंय. यात स्थानिक दहशतवादी सामील आहेत की पाकपुरस्कृत हे अद्याप स्पष्ट व्हायचं आहे. पण काश्मीर आणि लडाखमध्ये ३७० रद्द केल्यापासून किती जमिनी बाहेरच्या लोकांनी विकत घेतल्या? किती उद्योगांची पायाभरणी झाली? हे प्रश्न विचारले गेले तर त्याबाबत काहीही उत्तर सरकारकडे नाही.

खरे तर काश्मिरी शेतमाल, फळे, स्थानिक उत्पादने यांना बाजारपेठ उपलब्ध करून देत काश्मिरी जनतेची आर्थिक स्थिती उन्नत करावी यासाठी सरकारने अद्यापही ठोस पावले उचललेली नाहीत. सरहद संस्थेचे संजय नहार याबद्दल सातत्याने काम करत राहिले असले तरी असे व्यक्तिगत प्रयत्न तोकडे पडणार हे उघड आहे.

पर्यटन आणि इतर उत्पादन उद्योगाला संजीवनी देण्यासाठी सरकारनेच पुढाकार घेत 'घोषणा नको, काम हवं' या पद्धतीने काही केले तरच काश्मीरमध्ये पुन्हा डोके वर काढू लागलेल्या हिंसाचाराच्या घटनांवर पायबंद घालण्यात यश येण्याची शक्यता आहे. काश्मीरमधला मागचा आणि आजचाही संघर्ष आर्थिक शोषण आणि स्थिती याच पायावर आहे. बेरोजगार हात शस्त्र हाती घेण्यात पुढे असतात हे तत्त्व लक्षात घेतले पाहिजे. काश्मिरी लोकांची अर्थस्थिती आणि तिथला दहशतवाद यात अन्योन्य संबंध आहे हे सत्य समजावून घ्यावे लागेल.

**- संजय सोनवणी.**

## टुडेज ब्लॉग

# येथे मोजू जातीचे

एक देश म्हणून भारतातील तसेच विविध राज्यांतील राजकारण हे धर्म, जाती-जमाती यांच्याभोवती गेली कित्येक वर्षे गरगरा फिरत आले आहे. या राजकारणात जातनिहाय जनगणना हा मुद्दा कळीचा, मात्र राजकीयदृष्ट्या कमालीचा संवेदनशील. या जनगणनेची मागणी लावून धरून राज्याला असलेल्या अधिकारात बिहारमध्ये ती सुरू करण्याचे पाऊल संयुक्त जनता दलाचे नेते व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी उचलले आहे. एकीकडे केंद्राकडून होणारी देशातील जनगणना लांबणीवर पडत असताना नितीश यांनी हे पाऊल टाकले आहे. ७ ते २१ जानेवारी व ०१ ते ३० एप्रिल अशा दोन टप्प्यांत ही गणना होईल. त्यास किमान ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

### कशासाठी मोजायची जातनिहाय लोकसंख्या?

जातनिहाय आरक्षण हा देशाच्या राजकारणातील, समाजकारणातील संवेदनशील मुद्दा. शिक्षण व नोकऱ्यांतील आरक्षण, विविध योजना, प्रकल्प, कल्याणकारी उपक्रम, साह्यभूत उपक्रम यासाठी नेमकी जातनिहाय लोकसंख्या कळणे निकडीचेच. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या प्रकारची जनगणना म्हणता येईल अशी सन २०११ मध्ये झाली. त्या वेळच्या देशव्यापी जनगणनेत जातीआधारित नोंदी घेण्यात आला; मात्र त्यात काही त्रुटी असल्याचे सातत्याने सांगितले जाते. त्यामुळे तत्कालीन यूपीए सरकारने किंवा नंतरच्या भाजप सरकारनेही त्या नोंदींवर आधारित अहवाल प्रसिद्ध केला नाही. त्याशिवाय, २०२१च्या जनगणनेत जातनिहाय गणना होणार नाही, हेही केंद्राने स्पष्ट करून टाकलेले आहे.



१९३१ ते २०२३- ब्रिटिशांनी सन १९३१ मध्ये जातनिहाय जनगणना केली होती. त्याची आकडेवारी उपलब्ध आहे. त्या अहवालात अनुसूचित जाती व जमाती यांची लोकसंख्या, टक्केवारी मोजलेली होती; मात्र इतर अनेक जातींची स्वतंत्र नोंद केलेली नव्हती. त्यानंतर आजवर, म्हणजे सन २०२३ पर्यंत जवळपास ९० वर्षांपेक्षा अधिक काळात या गणनेच्या पुलाखालून बरेच पाणी नि राजकारण वाहून गेले. माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांच्या काळात मंडल आयोगाची अंमलबजावणी जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर जात व आरक्षण हा अधिकच धगधगता मुद्दा होऊन बसला. गेल्या काही वर्षांत ओबीसी आरक्षणाचा मुद्दा महाराष्ट्रासह विविध राज्यांतील राजकारणाच्या केंद्रस्थानी आला. या सगळ्या पार्श्वभूमीवर बिहारमधील जातनिहाय जनगणना महत्त्वाची ठरते.

### नितीश यांचे राष्ट्रीय गणित

राज्यात जातनिहाय जनगणनेचा निर्णय बिहार सरकारने गेल्या वर्षी दोन जून रोजी घेतला होता. तेव्हा मुख्यमंत्री नितीशकुमारच होते, मात्र त्यांच्यासोबत सत्तेत होता भाजप. आत्ताही नितीशकुमारच मुख्यमंत्री आहेत; पण त्यांच्यासोबत आहे लालू-तेजस्वी यादव यांचा राष्ट्रीय जनता दल. नितीशकुमार हे कितीही नाही नाही' म्हणत असले तरी त्यांची राष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाकांक्षा लपून राहिलेली नाही. सन २०२४च्या मे महिन्याच्या सुमारास अपेक्षित असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात ते मोठे ध्येय समोर बाळगून उतरण्याची शक्यता आहे. जातनिहाय जनगणना करून निवडणुकीच्या काही काळ आधी त्याचा अहवाल प्रसिद्ध करायचा, त्यानुसार काही निर्णय घ्यायचे आणि स्वतःची प्रतिमा उंचवायची, असे त्यांचे गणित असणारच.

### राजकारण? ते तर होणारच!

नितीश यांनी त्यांच्या सोयीचा असल्यास या गणनेचा अहवाल जाहीर केला तर त्यावरून देशपातळीवर राजकारणाचा कल्लोळ होणारच, कारण त्या वेळी लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झालेली असेल. हा अहवाल सादर करून केंद्रातील भाजप सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न नितीश करणारच, नि त्यांना विरोधकांची साथ मिळणारच. केंद्राने जातनिहाय जनगणना का केली नाही,' आधीची आकडेवारी का जाहीर केली नाही,' असे प्रश्न त्या वेळी नितीश व विरोधकांच्या भात्यात असू शकतील. त्या संदर्भात मोदी सरकार येत्या काळात काही हालचाल करते का, नितीश यांची खेळी निष्प्रभ करण्यासाठी काही वेगळी प्रतिखेळी खेळते का, यावर पुढचे राजकारण अवलंबून असेल.

**- राजीव काळे.**

## जन्म हा अखेरचा

### धर्माचारस्थल - ६



धर्म या दोन्ही अपेक्षा पूर्ण करतो. ज्याच्या आचरणामुळे माणसाचा अभुदय होतो आणि अंती मुक्ती प्राप्त होतो, त्याला 'धर्म' असे म्हणतात. अशा सर्वसिद्धीदायक धर्माचे आचरण जो नि:स्पृह आहे, अशा माणसाने देखील केले पाहिजे. आपण नि:स्पृह आहोत म्हणून धर्माचा त्याग करण्याचा त्याला अधिकार नाही.

**ज्ञानामृतेन तृप्तोऽपि योगी धर्मं न संत्यजेत् ।**
**आचारं महतां दृष्ट्वा प्रवर्तन्ते हि लौकिका : ।।१६.६५।।**

ज्ञान ही अंतिम व्यवस्था आहे. शिव-जीवाच्या अभेदाचा बोध हेच खरे ज्ञान होय. या ज्ञानाने पूर्ण तृप्ती लाभते. ज्याला ज्ञानामृताने तृप्ती लाभली अशा ज्ञानसंपन्न पुरुषाने धर्माचरण करावे काय?

एकदा एका सत्पुरुषाच्या आश्रमात एक ज्ञानी पुरुष गेला. भोजनाची वेळ झाल्यावर आश्रमातील सेवकांनी त्याला हातपाय धुण्यास सांगितले. तेंव्हा तो म्हणाला, 'मी ज्ञानगंगेत सुस्नात झालो आहे, मला हातपाय धुण्याची काय गरज आहे?'

सेवक बिचारे गप्प बसले. त्यांनी त्याला तसेच जेवायला वाढले. परंतु त्याच्यासमोर पाणी मात्र ठेवले नाही. ज्ञानी पुरुष जेवू लागला. जेवता जेवता त्याला तहान लागली. त्याने पाणी मागितले. त्यावेळी एक सेवक म्हणाला, 'महाराज, तुम्ही ज्ञानगंगेत स्नान केलेले आहे आणि ज्ञानामृताने तृप्त झाला आहात. तुम्हांला या वरच्या पाण्याची काय गरज आहे?'


**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# जोशी मठ धोका : १९६४ सालच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष

**जनमानस**

जोशी मठ हे उत्तराखंडमधील एक पर्यटन स्थळ. लोकसंख्या १६ हजार असून जोशीमठची समुद्रसपाटीपासूनची उंची ६,१५० फूट आहे. बद्रीनाथसह त्या परिसरात अन्य धार्मिक स्थळे व ट्रेकिंगसाठी येणाऱ्यांना हे राहण्याचे ठिकाण आहे. चार पिठांपैकी एक हे प्रवेशद्वार असल्यामुळे येथे नेहमीच भाविकांची गर्दी असते.

येथे गेल्या कांही दिवसांपासून काही ठिकाणी जमिनीला मोठे तडे गेले आहेत. जमीन खचू लागल्याने घरांना धोका निर्माण झाला आहे. सुमारे ६०० कुटुंबाचे स्थलांतर करावे लागणार आहे. १९६४ साली प्रथम या संकटाची चाहूल लागली होती त्यावेळी गढवालचे तत्कालीन जिल्हाधिकारी एम. सी. मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीत एकूण १८ सदस्य होते. 'जोशी मठ हे शहर संकटात असल्याचे या समितीने त्याचवेळी दाखवून दिले होते ही बातमी नुकतीच वाचली.' मुळातच हा भाग भूकंपप्रवण व भूस्खलनप्रवण आहे. वातावरणाचा परिणाम व जमीन तुलनेने भुसभुशीत आहे. या भागात बेसुमार बांधकामे, रस्ते बांधणी करणे, धरणे बांधणे व वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात आले आहेत. जलविद्युत प्रकल्पासाठी बोगदे खणण्यात आले आहेत. गेल्या काही दशकात झालेल्या बांधकामामुळे डोंगराचे उतार कमालीचे भुसभुशीत बनले आहेत.



सन २०१३ मध्ये केदारनाथ येथे जो पूर आला होता, त्यामुळे येथील परिस्थिती आणखीनच भयावह झाली आहे. १९६४ साली मिश्रा कमिटीने दिलेला इशारा जर मानला असता व त्याप्रमाणे कार्यवाही केली असती तर हा आत्ताचा प्रसंग कदाचित ओढविला गेला नसता असे वाटते.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# गोड गळ्याचे गायक : येसुदास

**आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८३ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम-ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले.**

कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपटसृष्टीपर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या 'छोटीशी बात' या चित्रपटासाठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्या चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. 'जानेमन जानेमन तेरे दो नयन' या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले. मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत.



येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

भारत सरकारने त्यांना २००२ साली 'पद्मभूषण' हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम 'स्वाती पुरस्कारम्' या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली 'गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे' ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार, दौंड, पुणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णुपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# पंढरपूर पोलिसांनी अट्टल गुन्हेगारांकडून १०१ एटीएम कार्ड केले जप्त; दोघे अटकेत

सुराज्य/पंढरपूर

एटीएम कार्डची अदलाबदल करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीतील दोन गुन्हेगारांना पंढरपूर शहर पोलीस ठाणे व खंडणी विरोधी शाखा, पोलीस आयुक्तालय ठाणे शहर यांचे संयुक्त कारवाईमध्ये ताब्यात घेण्यात आली असून आरोपीकडे १०१ एटीएम कार्ड मिळवून आले असल्याची माहिती पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण घुगे यांनी दिली.

ठाणे शहर, नवी मुंबई, नाशिक, पुणे, सोलापूर परिसरात एटीएम मध्ये जाणा-या नागरिकांना बोलण्यात गुंतवून ठेवून त्यांचे एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करून रक्कम काढून घेण्याबाबतचे तक्रारींचे प्रमाण वाढले होते. त्या अनुषंगाने खंडणी विरोधी शाखा, पोलीस आयुक्तालय ठाणे शहर व सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांना सदरचे फसवणुकीचे गुन्ह्यांबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना व दाखल गुन्ह्यांचा कौशल्यपूर्ण तपास करण्याबाबत वेळोवेळी वरिष्ठांकडून सूचना व मार्गदर्शन मिळाले होते.



पोलीस आयुक्तालय ठाणे शहर व सोलापूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये घडलेल्या गुन्ह्यांचा तपशील संकलित करून घटनास्थळांवरील कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास करून अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांची माहिती प्राप्त करून एटीएम कार्ड बदली करून फसवणूक करणा-या सराईत गुन्हेगार यांचा कसोशीने मार्ग काढत असताना ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील खंडणी विरोधी शाखा यांना पाहिजे असलेले आरोपी सनी ऊर्फ विकण्या मुन्ना सिंग वय २७ रा. नेहरूनगर, विठ्ठलवाडी, कल्याण पूर्व, जि. ठाणे मूळ जि. कानपूर, उत्तरप्रदेश, श्रीकांत प्रकाश गोडबोले वय २८ वर्ष, रा. भैयासाहेब आंबेडकर नगर, खेमाणी उल्हासनगर २, जि. ठाणे हे दि ०२ जानेवारी २०२३ रोजी पंढरपूर शहर पोलीस ठाणे हदीत आहेत. अशी माहिती पोलीस उपनिरीक्षक महेश कावळे, नेमणूक खंडणी विरोधी शाखा, पोलीस आयुक्तालय ठाणे शहर यांना मिळाल्यावर त्यांनी तात्काळ पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात संपर्क साधला असता सदर आरोपीबाबत माहिती कळविली. त्यानुसार पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलिसांनी तात्काळ दोन पथके तयार करून आरोपीचा कसोशीने शोध घेण्यास सुरवात केली तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे सिनेस्टाईल प्रमाणे आरोपी पंढरपूर शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. असता त्यांचेकडे वेगवेगळ्या बँका एकूण १०१ एटीएम कार्ड मिळाले असल्याचे निष्पन्न झाले आहे. याबाबत पोलिसांनी अधिक चौकशी केली असता आरोपींनी या पूर्वी ठाणे शहर, नवी मुंबई, पुणे, नाशिक, पंढरपूर या हदीत गुन्हे केल्याची कबुली आरोपींनी दिली आहे. सदरचे आरोपींना पंढरपूर शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील कार्यवाही करिता खंडणी विरोधी शाखा, ठाणे शहर पोलीस आयुक्तालय यांचेकडे हस्तांतरित करण्याची प्रकीया चालू आहे.

सदरची कार्यवाही सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, हिंमत जाधव अपर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, विक्रम कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर, अरुण फुगे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत भागवत, पोना प्रसाद औटी, पोना समाधान पाटील, पोशि माधव वडडेटीवार, पोशि निलेश कांबळे, चालक पोशि रामकिसन खेडकर सायबर पोलीस ठाण्याचे पोशि/ आत्तार तसेच खंडणी विरोधी शाखा, ठाणे शहर यांचेकडील पोलीस उपनिरीक्षक महेश कावळे यांनी पार पाडली असून पुढील तपास खंडणी विरोधी शाखा, पोलीस आयुक्तालय ठाणे शहर हे करीत आहेत.



## चवडेकर यांच्या 'दूर मौनाच्या किनारी' या गझलसंग्रहाचे प्रकाशन

**सोलापूर** : येथील प्रसिद्ध गझलकार व हझलकार श्री.कालिदास चवडेकर यांच्या 'दूर मौनाच्या किनारी' या गझलसंग्रहाचे ७ जानेवारी २०२३ रोजी दुपारी वाजता रत्नागिरी येथे संपन्न झालेल्या काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या तेराव्या राज्यस्तरीय काव्यमहोत्सवात प्रकाशन झाले. ज्येष्ठ गझलकार श्री. ए.के. शेख यांच्या शुभहस्ते सदर गझलसंग्रहाचे प्रकाशन संपन्न झाले असून सदर प्रसंगी त्यांनी संग्रहातील गझलांचे सादरीकरण करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रकाशन समारंभात अध्यक्ष म्हणून काव्यप्रेमीचे राज्याध्यक्ष श्री.आनंद घोडके हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून साहित्य अकादमी पुरस्कार विजेते इब्राहिम अफगाण, उर्मिला बांदिवडेकर, तसेच ज्येष्ठ साहित्यिकअशोक लोटणकर हे उपस्थित होते. याशिवाय काव्यप्रेमीचे कृष्णा शिंदे, राष्ट्रपाल सावंत, प्रमोद बाविस्कर, जया नेरे, संजय कुळये, मुग्धा कुळये, विजय जोशी, आशीष सावंत व संजय तांबे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी काव्यमहोत्सवात राज्यभरातून आलेले सुमारे दोनशेहून अधिक कवी, गझलकार उपस्थित होते.

## मॉडर्न हायस्कूल जवळ आढळल अतिविषारी घोणस!

**सोलापूर** : सोलापुरातील मॉडर्न हायस्कूल जवळ रात्री ९ वा. दरम्यान मोकळ्या मैदानात एक भला मोठा सर्प वावरत असल्याचे निदर्शनास आले व बघ्यांची गर्दी जमा झाली. निसर्गप्रेमी सर्पमित्र संघटनेचे संस्थापक सर्पमित्र भीमसेन लोकरे यांना या घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र भीमसेन लोकरे हे तात्काळ त्या ठिकाणी पोहोचून पाहणी केली असता त्या ठिकाणी खुपच मोठा व भारतातील अतिविषारी असा घोणस जातीचा सर्प तेथे आढळून आला. त्या सर्पास सुरक्षित रित्या पकडून सर्पमित्र भीमसेन लोकरे यांनी तेथे जमलेल्या नागरिकांना सापांविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली.



## मानसी गायकवाडचा जनता विद्यालयात सत्कार

**वेळापूर** : मळोली तालुका माळशिरस येथील जनता विद्यालय व जुनिअर कॉलेज मळोली या प्रशालेची विद्यार्थिनी कुमारी मानसी उमेश गायकवाड इयत्ता आठवी हिने शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये ३०० पैकी २०६ गुण मिळवून सुयश मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले आहे तसेच पाचवी ते आठवी मधील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश मिळवलेल्या सर्वांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष व पंचायत समिती सदस्य रणजीतसिंह जाधव, मळोली उपसरपंच महादेव पवार, प्रशालेचे मार्गदर्शक व मळोली विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमन सत्यजित जाधव, प्राचार्य बी आर जाधव, पर्यवेक्षक तानाजी लवटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## आसरा सोसायटीमधील 'त्या' रस्ते कामास स्थगिती

सुराज्य/सोलापूर

जुनी व कालबाह्य झालेली ड्रेनेजलाईन न बदलताच महापालिकेच्या वतीने आसरा सोसायटीमध्ये होत असलेल्या रस्ते कामास न्यायालयाने स्थगिती दिली आहे, असे संकेत किल्लेदार यांनी सांगितले.

१९७२ पासून असलेल्या आसरा सोसायटीत सहा इंची जुनी ड्रेनेज लाईन असून ती कालबाह्य झाली आहे. त्यामुळे ड्रेनेजलाईन तुंबण्याची समस्या या सोसायटीत उद्भवत आहे. असे असताना महापालिका प्रशासनाने ही लाईन काढून त्याठिकाणी नवीन लाईन न टाकताच रस्ते काम हाती घेतले.

नगरोत्थान योजनेच्या ३२ लाखांच्या निधीतून रस्ते काम करत असल्याने सोसायटीतील रहिवासी संकेत किल्लेदार यांनी न्यायालयात धाव घेतली आहे. या प्रकरणी सुनावणी सुरू आहे. तूर्तास काम थांबवण्याचे आदेश न्यायालयाने दिल्याची माहिती किल्लेदार यांनी दिली. पाच जानेवारी रोजी सुनावणी होऊन तूर्तास काम थांबवण्यात आले. सुनावणीच्या वेळी महापालिका मत मांडणार आहे.

### दिशाभूल करण्याचे प्रयत्न; काम सुरू करा : शेख

नागरिकांच्या मागणीनुसार तेथे रस्ते काम माजी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंजूर केल्याची माहिती माजी नगरसेविका तस्लीम शेख यांनी दिली. किल्लेदार यांच्याकडून नगरसेवकांना श्रेय मिळू नये म्हणून दिशाभूल करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या रस्त्यावर खडी पडली आहे. येथे शाळा आणि हॉस्पिटल असल्याने लोकांना येण्या-जाण्यासाठी त्रास होते आहे. त्यामुळे हे काम सुरू करण्याची मागणी शेख यांनी आयुक्तांकडे केली आहे. यावेळी इरफान शेख, ज्योत्स्ना पाटील, सिद्धेश पाटील, गंभीरे, जाहेद कुरेशी, जलाल शेख, रोहित जाधव यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले.

## भंडारकवठ्याचे ज्येष्ठ शिक्षक बसवंत भरलेगुरूजी यांचे निधन

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर- भंडारकवठे येथील ज्येष्ठ शिक्षक तथा निंबर्गी येथील श्री महासिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक बसवंत महादेव भरलेगुरूजी (ब.म.) यांचे सोमवारी सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. भंडारकवठे येथे मंगळवारी सकाळी ११वा. त्यांच्यावर अंत्यसस्कार केले जाणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली चार नातवंडे आहेत



सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. निबंर्गी, भंडारकवठे, अंत्रोळी, वडापूर येथे प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून त्यांनी कार्य केले. गरीब विद्यार्थ्यांसाठी त्यांनी स्वतःच्या घरातच वसतिगृह सुरू केले होते.

देशाच्या स्वातंत्र्याची त्यांनी पहाट अनुभवली. त्या काळामध्ये स्वातंत्र्य लढ्यातील सेनानींना मदत करणारे गुरुजी म्हणून त्यांची विशेष ओळख निर्माण झाली होती. सातवी पास झाल्यानंतर अनट्रेंड म्हणून स्कूल बोर्डातील शिक्षक म्हणून अंत्रोळी येथे त्यांनी पहिली नोकरी सुरू केली. सेवा करत असताना ते पंढरपूरला प्रशिक्षणाला गेले. तत्कालीन सरकारने प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची स्टायफंड बंद केली होती. त्या विरोधात स्टायफंड मिळवण्यासाठी संघटनात्मक शक्ती त्यांनी उभी केली. सोलापूर जिल्ह्यातील बुजुर्ग शिक्षक मंडळींना एकत्र करून सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक एज्युकेशन सोसायटीची निर्मिती करून पंढरपूर येथे विवेक वर्धिनी रूपाने एक मॉडेल स्कूल निर्माण केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यात माजी राज्यमंत्री स्व. दी.शि. कमळे गुरुजी यांच्या राजकारणात सक्रिय सहभाग घेऊन कमळे गुरुजींना सहयोग देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. शैक्षणिक व सामाजिक कार्य पाहून १९९३ साली राज्य शासनाने त्यांना राज्यपाल पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. श्री महासिध्द शिक्षण प्रसारक मंडळ संचलित निंबर्गी या गावात बसवेश्वर शाळेची उभारणी त्यांनी केली. येत्या २३ जानेवाला ते ९३ व्या वर्षात पदार्पण करणार होते.

## रोटरी क्लबच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर

सुराज्य/सांगोला

रोटरी क्लब ऑफ सांगोला व डॉक्टर डोंबे हॉस्पिटल सांगोला यांचे संयुक्त विद्यमाने सांगोला येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले या शिबिराचे उद्घाटन सांगोला सूतगिरणीचे संचालक इंजि मधुकर कांबळे यांच्या हस्ते संपन्न झाले सदर शिबिरामध्ये साठ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.

यावेळी डॉ शैलेश डोंबे यांचा सत्कार रोटरी चे माजी अध्यक्ष इंजि हमीद शेख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी यावेळी रोटरीचे अध्यक्ष दत्तात्रय पांचाळ सहसचिव इंजि विलास बिले सदस्य अरविंद डोंबे डॉ अनिल कांबळे मिलिंद बनकर श्रीपती आदलिंगे अरुण कांबळे यांचे सह हॉस्पिटल मधील स्टॉप उपस्थित होता.

## निधन वृत्त

### धरेप्पा अरवत



**अक्कलकोट** : तालुक्यातील कोर्सेगाव येथील ज्येष्ठ प्रगतशील शेतकरी धरेप्पा धर्मण्णा अरवत यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. सोमवारी कोर्सेगाव येथील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, सूने व नातवंडे असा परिवार आहे. पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा माजी जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र अरवत यांचे ते वडील होत.

### लक्ष्मण लेंगरे



**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील लक्ष्मण जयवंत लेंगरे (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मूले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### रत्नाबाई भिसे



**सोलापूर** : न्यू शिवाजी नगर येथील रत्नाबाई बाबुराव भिसे (वय ९५) यांचे निधन झाले. त्यांच्या पाश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा राहत्या घरापासून मंगळवारी सकाळी निघणार आहे.

### निलाबाई उंबरजे



**अक्कलकोट** : तालुक्यातील करजगी येथील निलाबाई शिवयोगेप्पा उंबरजे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सहा मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा उद्या दुपारी एक वाजता राहत्या घरातून निघणार आहे.करजगी येथील श्री बसवेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड.दयानंद उंबरजे व करजगी विकास सोसायटीचे चेअरमन विवेकानंद उंबरजे यांच्या काकू होत.

### सहाय्यक फौजदार खलील नाईकवाडी



**सोलापूर** : सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील सहाय्यक फौजदार खलील (बबलू) सैफनसाब नाईकवाडी (रा. विकास नगर ,सिविल हॉस्पिटल बाजूला, सोलापूर) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने सांगोला येथे सेवा बजावताना निधन झाले. मृत्यू समयी ते ५४ वर्षांचे होते.कामती पोलीस ठाण्यात ते सहायक फौजदार म्हणून कार्यरत होते. सन १९९२ साली ते पोलीस खात्यात रुजू झाले होते.

## मिनी ऑलंम्पिक स्पर्धेत सोलापूर संघाला कास्यपदक

**सोलापूर** : हँडबॉलमध्ये सोलापूर नागपूर येथे झालेल्या मिनी ऑलंम्पिक स्पर्धेत सोलापूर संघाने तीन सामन्यात विजय मिळवत कांस्य पदकावर नाव कोरले. नागपूर येथील विभागीय क्रीडा संकुलमध्ये स्पर्धेचे आयोजन केले होते सोलापूर संघाने पहिल्या सामन्यात कोल्हापूरचा ३३-२२, दुसरा सामना अमरावतीचा ३४-२८, तिसरा सामना मुंबईचा ३४-३२ असा पराभव करत कास्यपदकावर नाव कोरले. संतोष दोरकर, सचिन काळे, श्रीनिवास पिंडपल्ली, विनायक काळे, अतुल गवळी, आकाश अमदिपूर, श्रेयस मालप, राज घाटे, सुहेल शेख, प्रताप सुरवसे, निवास उगले, निलेश सातव, संगमेश हिरेमठ, विश्वजित लोहार, समर्थ भीमरती यांनी उत्कृष कामगिरी केली. या संघाला प्रा. राहुल हजारे, प्रशिक्षक प्रा. आनंद चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. सोलापूर शहर व जिल्हा हँडबॉल असो.चे अध्यक्ष डॉ. पुरणचंद्र पुंजाळ, अजिंक्यतारा स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष सुदेश मालप, सुहास जाधव यांनी अभिनंदन केले.



सोलापूर सिध्देश्वर सह.बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल शिवानंद कोनापुरे व प्रकाश हत्ते यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी परिवारातील ज्येष्ठ भिमाशंकर कोनापुरे, नीलकंठप्पा कोनापुरे, बसवराज कोनापुरे, प्रकाश कोनापुरे, अशोक कोनापुरे आदी परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## स्पीडब्रेकरवर टेंपोतील मजूर बाहेर फेकल्याने जखमी

**सोलापूर** : चारचाकीतून प्रवास करताना स्पीडब्रेकर वर पिकप उडाली. आणि त्यातील मजूर बाहेर फेकला जाऊन गंभीर जखमी झाला. ही घटना खेडभोसे (ता. पंढरपूर) येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. गजानन हरिदास राठोड (वय ५० रा. लोणार जि.बुलढाणा) असे जखमी झालेल्या मजुराचे नाव आहे. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गजानन राठोड हा ऊस तोडीचा कामगार आहे. तो काम आटपून इतर कामगारांसोबत पिकप मधून आपल्या वस्तीकडे निघाला होता. दरम्यान खेडभोसे येथील एका स्पीड ब्रेकरवर टेम्पो आदळली. त्यात गजानन राठोड हा वाहनातून रस्त्यावर फेकला जाऊन जखमी झाला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## रिक्त पदे भरताना बदली, मानधनावरील कामगारांचा विचार करावा

### महापालिका कामगार संघटना कृती समितीची निवेदनाद्वारे मागणी!



सुराज्य/सोलापूर

महापालिकेतील रिक्त पदे भरताना गेली २५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या बदली, रोजंदारी, कंत्राटी व मानधनावरील कामगारांचा प्राधान्याने विचार करावा अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने निवेदनाद्वारे केली आहे.

कामगार नेते अशोक जानराव यांच्यासह शिष्टमंडळाने महापालिका आयुक्तांना निवेदन दिले. या दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सोलापूर महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार एकूण ४६१२ पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी विविध विभागात व विविध संवर्गातील एकूण १ हजार १२५ जागा गेली १५-२० वर्षापासून रिक्त आहेत. विविध संवर्गातील रिक्त पदापैकी अ वर्गात ७७ पदे, ब वर्गातील १७७ पदे, क वर्गातील ५४७ पदे आणि ड वर्गातील ३१० पदे एकूण १ हजार १११ पदे रिक्त आहेत. राज्य शासनाच्या सुचनेप्रमाणे भरती प्रक्रिया राबविताना ड वर्गातील ३१० पदे ही चुतर्थश्रेणी मधील घनकचरा विभागातील बदली रोजंदारी बिगारी, त्याच बरोबर पी.एच.ई. कडील रोजदारी चावीवाले, परिचारिकांची प्रथम त्यांच्या प्रदिर्घ सेवेचा विचार करुन त्यांची भरती करावी, क वर्गातील कारकून सेवकांना प्रथम पदोन्नतीने प्रमोशन देवून विविध विभागातील रोजंदारी वाहनचालक, घनकचरा विभागातील रोजंदारी बदली आरोग्य निरिक्षकांच्या जेष्ठता यादीप्रमाणे कायम सेवेत घ्यावे. अ व ब वर्गातील अधिकारी व वरिष्ठ सेवकांना त्यांची पदे भरताना नव्या भरती, नियमावलीनुसार ७० टक्के पदे पदोन्नतीने भरावीत, असे कामगार नेते अशोक जानराव यांनी निवेदनात म्हटले आहे.यावेळी शशिकांत शिरसट , सिद्धू सोनवणे , भारत क्षिरसागर उपस्थित होते.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

भाडेतत्वावर वाहन मिळणे बाबत

अउदा पॅक विभाग-३, सोलापूर येथे भाडेतत्वावर टाटा सुमो/महिंद्रा बोलेरो प्लस किंवा तत्सम वाहनाची आवश्यकता असून कार्यालयीन चौकशी क्र. ०७ दि. ०५/०१/२०२३ असून इच्छुकांनी त्यांचे कोटेशन सीलबंद लिफाफयात दि. १७/०१/२०२३ संध्याकाळी ०५:३० वाजेपर्यंत सादर करावे. वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती www.mahatransco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दुरध्वनी क्र. ७४४७४४०८५४.

सही/-
कार्यकारी अभियंता
पॅक विभाग-३, सोलापूर

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे पती जितेंद्र काशिनाथ कोळेकर हे दि.२०/०३/२०२२ रोजी मयत झाले असून त्यांचे नावे ऑटोरिक्षा परमिट क्र .एम.एच.१३/४२४/एचएसआर/९७ असा आहे. मी मयताची पत्नी या नात्याने कायदेशीर वारसदार असून वरील ऑटोरिक्षा परमिट माझे नावे करण्यासाठी मा.आरटीओ साहेब, सोलापूर यांचेकडे अर्ज करीत आहे. तरी कोणाची हरकत असल्यास त्यांनी ८ दिवसांत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

सही/-
अनिता जितेंद्र कोळेकर
२३९, स्वामी विवेकानंद नगर, मजरेवाडी, सोलापूर

# बार्शीचा के.टी.ट्रॅक्टर्स सलग तिसऱ्यावर्षी ट्रॅक्टर विक्रीमध्ये प्रथम

✔ सुराज्य/बार्शी

जपानस्थीत कुबोटा ॲग्रीकल्चर मशिनरी इंडिया कंपनीचे सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्याचे कुबोटा ट्रॅक्टरचे वितरक के.टी.ट्रॅक्टर्स बार्शी यांना २०२२ या वर्षात ग्राहक सेवा, सेवा समर्थन, ग्राहक समाधान, शाखाविस्तार, सक्षम मनुष्यबळ, विक्रमी ट्रॅक्टर विक्री, बाजारातील कुबोटा टॅक्टरचा मार्केट शेअर आदी मापदंडामध्ये बाजी मारत उत्तमरीत्या काम करत सलग तिसऱ्यांदा ट्रॅक्टर विक्रीमध्ये जगामध्ये क्रमांक एक मिळवला आहे..




तालुक्यातील खामगाव येथील रहिवाशी असलेल्या संतोष ठोंबरे यांनी २०१० साली बार्शीतील लातूर रोडवर के.टी.ट्रॅक्टर हे कुबोटा कंपनीचे शोरुम सुरु केले. अल्पावधीतच त्यांनी या व्यवसायात ग्राहकांचा विश्वास संपादन करीत ट्रॅक्टर विक्रीमध्ये बाजी मारण्यास सुरुवात केली. त्यांच्याकडे सोलापूर व उस्माबाद या दोन जिल्ह्याचे कार्यक्षेत्र असून दोन्ही जिल्ह्यातील २३ शाखांच्या माध्यमातून ठोंबरे यांनी २०२२ मध्ये सुध्दा १२५२ ट्रॅक्टरची विक्रमी विक्री केली आहे. मागील दहा वर्षात त्यांनी ७५०० पेक्षा जास्त ट्रॅक्टरची व्रिकी करुन एक नवीन मापदंड तयार केला आहे..

के.टी. ट्रॅक्टरच्या ०१/०१/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये कंपनीचे झोनल मॅनेजर सचिन राजमाने यांनी के.टी ट्रॅक्टरने ग्राहकांना दिलेली सेवा, सर्व्हीस सपोर्ट, ग्राहकांचे समाधान, शाखाविस्तार व सक्षम मनुष्यबळ, बाजारातील कंपनीचा मार्केट शेअर वाढवल्याबद्दल कौतुक केले.

### सचिन राजमाने झोनल मॅनेजर कुबोटा ट्रॅक्टर
### उद्योगासोबत सामाजिक कार्यातही अग्रेसर

उद्योगामध्ये अग्रेसर असलेल्या संतोष ठोंबरे यांनी सामाजिक कामात देखील आपला सक्रिय सहभाग कायम ठेवला आहे. मातृभूमी प्रतिष्ठाण, सहयोग स्थानिक रहिवाशी मंडळ, भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट सोसायटी, बार्शी तालुका क्रिकेट असो, आदी संस्थांचे अध्यक्ष म्हणून देखील ते प्रभावीपणे लोकहिताचे काम करीत असून बार्शी सारख्या तालुक्याच्या ठिकाणी व्यवसाय करीत असताना संतोष ठोंबरे यांनी केलेली ही देश व जागतिक पातळीवरील कामगिरी निश्चीतच बार्शीकरांसाठी अभिमानाची बाब असून त्यांच्या या कामगीरीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

के.टी. ट्रॅक्टर्स ने देशात नव्हे तर जगात कुबोटा कंपनीच्या ट्रॅक्टर विक्रीमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. देशातील विविध राज्यामध्ये कंपनीचे सुमारे ३५० पेक्षा जास्त डिलर आहेत. या डिलरमध्ये के.टी.ट्रॅक्टर्सने सर्वाधिक विक्री केली आहे.त्यांनी केवळ देशामध्ये नव्हे तर संपुर्ण जगामध्ये असलेल्या कुबोटा कंपनीच्या डिलरमध्ये ट्रॅक्टर विक्रीमध्ये अव्वल क्रमांक मिळवला आहे.



## बु.सिद्राम अमृता गोतसुर्वे परिवाराच्या वतीने वार्ड क्र.१ बिनविरोध

✔ **अक्कलकोट** : आचेगांव, ता. दक्षिण सोलापूर ग्रामपंचायतीच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या या निवडणुकीत वार्ड क्रमांक एक मधील सर्वसाधारण जागेसाठी उभे असलेले मंगल सिद्राम गोतसुर्वे व भाजपा अनुसूचित जाती तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे यांच्या पत्नीगौतमी बलवान गोतसुर्वे या बिनविरोध निवडून आल्याबद्दल बुद्धवाशी सिद्राम अमृता गोतसुर्वे यांच्या परिवाराच्या वतीने व अपतेस्ट व हितचिंतकाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आले.व अटीतटीच्या या निवडणुकीत बिनविरोध निवडून दिल्याबद्दल सर्वांनी कौतुक केले. यावेळी शकुंतला वाघमैतर, वत्माला इंगळे, शांताबाई गायकवाड, कांचन बनसोडे, अर्चना जगधने, कल्याणी गायकवाड यांच्याकडून आहेर व सत्कार करण्यात आले व सर्वांनी भावी काळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जगन्नाथ गोतसुर्वे, दिनेश गोतसुर्वे, कपिल गोतसुर्वे, सुमित पाटील, अजय कांबळे आदिसह सर्व मित्रमंडळ उपस्थित होते.

## नागपूर येथील ऑलम्पिक स्पर्धेत सोलापूर हँडबॉल पुरुष संघास कांस्य पदक

✔ **सोलापूर** : नागपूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य ऑलम्पिक स्पर्धा सोलापूर हँडबॉल पुरुष संघास कांस्य पदक मिळाले. दि.५ ते ८ जानेवारी दरम्यान नागपूर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य ऑलम्पिक स्पर्धेत सोलापूरच्या पुरुष हँडबॉल संघाने तृतीय क्रमांक पटकावला. संघा समवेत प्रा. राहुल हजारे, प्रशिक्षक प्रा. आनंद चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. कांस्य पदक प्राप्त खेळाडू :संतोष दोरकर, सचिन काळे, अभिजित बंगाळे, श्रीनिवास पिंडपल्ली, विनायक काळे, अतुल गवळी, आकाश अमदिपूर, श्रेयस मालप, राज घाटे, सुहेल शेख, प्रताप सुरवसे, निवास उगले, निलेश सातव, संगमेश हिरेमठ, विश्वजित लोहार, समर्थ भीमरती वरील सर्व यशस्वी खेळाडूंचे सोलापूर शहर व जिल्हा हँडबॉल असो.चे अध्यक्ष डॉ. पुरणचंद्र पुंजाल, अजिंक्यतारा स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष सुदेश मालप, सुहास जाधव यांनी अभिनंदन केले.

## विवेकानंद स्कूलचे योगासन स्पर्धेत यश

✔ **सोलापूर** : सोलापूरच्या शैक्षणिक वर्तुळात वेगळा ठसा उमटविलेल्या स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान संचलित विवेकानंद पब्लिक स्कूलने जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. सोलापूर जिल्हा योग परिषद, राणी कित्तुर चन्नम्मा प्रतिष्ठान व रोटरी क्बल ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ जानेवारी २०२३ रोजी सोलापुरात आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत बालगट ते दुसरी मुलींच्या गटात स्कूलमधील समृध्दी वाघमारे (इ. २री) हिने प्रथम क्रमांक, अनिका काबरा (इ. युकेजी), द्वितीय क्रमांक, राधा गुदले (इ. १ली), तृतीय क्रमांक पटकाविला तर बालगट ते दुसरी मुलांच्या गटात स्कूलमधील कुणाल पाटील (इ. १ली) यास उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले तसेच खुल्या वयोगटात स्कूलचे क्रीडाशिक्षक विठ्ठल वाघचवरे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना स्कूलचे क्रीडाशिक्षक विठ्ठल वाघचवरे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्वच स्तरातून यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## शालेय रग्बी स्पर्धेत सुरवसे हायस्कूल विजेता

✔ **सोलापूर** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, सोलापूर, सोलापूर जिल्हा रग्बी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या १४ वर्षे मुलींच्या संघाने शहरस्तरीय शालेय रग्बी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत आमच्या संघाने इप्पाकायल प्रशालेचा ५-० व फायनलमध्ये निर्मलाताई ठोकळ प्रशालेचा ५-० ने पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद मिळविले. या विजयी संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक दत्ताअण्णा सुरवसे, अध्यक्ष राजकुमार सुरवसे, सचिवा विजया सुरवसे, प्राचार्या उज्ज्वला साळुंके यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.संघातील श्रावणी लोखंडे, अंकिता बबलाद, झेबा मुतवल्ली, श्रृतिका लालसरे यांनी खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. विजयी संघास क्रीडाशिक्षक सचिन गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## सेवानिवृत्त शिक्षकांतर्फे आयुक्तांचा सत्कार

✔ **सोलापूर** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शहर सोलापूर, अखिल महाराष्ट्र सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ शहर, सोलापूर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन, सोलापूर उर्दू प्राथमिक टीचर्स असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर महानगरपालिका आयुक्त शितल तेली-उगले यांचा सत्कार सेवानिवृत्त मुख्याध्यापिका पद्मजा सर्वगौड यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला तर उपायुक्त विद्या पौळ यांचा सत्कार सरोजिनी वाले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रास्ताविक अ.रा. अवटे, नबीलाल शेख यांनी केले. याप्रसंगी अरुणकुमार हुच्चे, सूर्यकांत कुडल, पांडुरंग वडनाल, ताजुद्दीन शेख, इकबाल मुल्ला, धानय्या मठपती, नरसप्पा कोंकत्ती, शैलजा चौधरी, एम. जी. शेख, कमल हत्याळीकर इ. सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.

## हॉटेल शिवपार्वती लॉज मध्ये बांधकाम ठेकेदाराचा संशयास्पद मृत्यू

✔ **सोलापूर** : लकी चौकातील हॉटेल शिव पार्वती लॉज मधील खोलीमध्ये एका बांधकाम ठेकेदाराचा मृतदेह संशयास्पद रित्या आज सोमवार रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास आढळून आला. भीमाशंकर धावरू चव्हाण (वय ४३ वर्ष, रा. नरसिंग नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर) असे त्या मयत बांधकाम ठेकेदाराचे नाव असून ते मूळचे राहणारे कर्नाटक राज्यातील आनंदेश्वर गुलबर्गा येथील. कामधंद्यासाठी ते दहा पंधरा वर्षांपूर्वी सोलापुरात स्थायिक झाले होते. घटनेच्या दोन दिवसांपूर्वी ते घरातून निघून गेले होते. यापूर्वी देखील ते याचप्रमाणे घरातून निघून गेले असल्यामुळे याबाबत घरच्यांनी पोलिसात मिसिंग दाखल केली नव्हती. ते लकी चौकातील शिवपार्वती लॉज मध्ये उतरले होते. सोमवारी दुपारी त्यांच्या रूमचा दरवाजा बंद होता. वेटरने आवाज दिला प्रतिसाद मिळाला नाही. फोनही केला त्यालाही प्रतिसाद न मिळाल्याने लॉज वाल्याने फौजदार चावडी पोलिसांना ही कल्पना दिली. तेव्हा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून दरवाजा तोडला असता खोलीतील बाथरूम मध्ये भीमाशंकर चव्हाण हे मृतावस्थेत मिळून आले. बांधकाम व्यवसायात अनेकांनी त्यांचे पैसे बुडविल्याने त्यांना कर्ज झाल्याचे त्यांच्या घरच्यांनी सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन मुले असा परिवार आहे.

## हरितक्रांतीचा पाया जगतापांनी उभारला : आ.संजयमामा

✔ सुराज्य/कुर्डूवाडी



उजनी धरणाच्या उभारणीत माजी आमदार नामदेवराव जगताप यांचा सिंहाचा वाटा आहे . त्यांच्या दूरदर्शीपणामुळेच आज सोलापूर जिल्ह्यात तब्बल ४० साखर कारखाने असून जिल्ह्यात झालेल्या हरितक्रांतीचा मुळ पाया नामदेवराव जगताप यांनी उभारला असून कै जगताप यांचे शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील कार्य अविस्मरणीय असून संपूर्ण जिल्हा त्यांचा रुणी असल्याचे गौरवोद्गार करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे यांनी काढले.

कै . नामदेवराव जगताप यांच्या १०३ व्या जयंती निमित्त बाजार समिती येथे आयोजीत समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार जयवंतराव जगताप होते.

याप्रसंगी भाजपाचे युवानेते शंभुराजे जगताप, माजी उपनगराध्यक्ष नारायण जगताप, सामाजिक कार्यकर्ते श्रेणीक खाटेर, वाशिंबेचे सरपंच तानाजी झोळ, रावगावचे सरपंच दादासाहेब जाधव, पंचायत समितीचे माजी सदस्य तात्यासाहेब शिंदे, मांगी सोसायटीचे चेअरमन सुजीत बागल, शहाजी शिंगटे, प्रभाकर शिंदे, राजेंद्र चिवटे, परेश दोशी,विक्रांत मंडलेचा, मिलिंद दोशी, मनोज पितळे,अमृत परदेशी , नवनाथ सोरटे,झनकसिंग परदेशी, अँड नवनाथ राखुंडे,जिल्हा बँकेचे वरीष्ठ बँक निरीक्षक अभयसिह आवटे, बाजार समितीचे सचिव विठ्ठल क्षीरसागर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक युसुफ शेख यांनी, सूत्रसंचालन प्रा . दत्तात्रय भागडे यांनी केले व आभार गटसचिव बबन मेहेर यांनी मानले .

## विवेकानंद प्रतिष्ठानतर्फे मार्चमध्ये सामूदायिक विवाह

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट येथे विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने शनिवार दि. १८ मार्च रोजी सर्वधर्मीय सामूदायिक विवाह सोहळा आयोजीत करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

मागील ११ वर्षापासून सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन अतिशय नीटनेटकेपणाने करून अनेक नववधुवरांचा संसारला गती दिली आहे.

या विवाह सोहळयात नोंदणी केलेल्या नववधुवरांना असा आहेर, संसार उपयोगी साहित्य देण्यात येते. तरीच नवदापत्याना संसाराबद्दल योग्य समुपदेशन व वैदयकीय मार्गदर्शन केले जाते. मुखीसंसारातून पहिली मुलगी जन्मात आल्यास मुलींच्या नावाने रू २०००.०० चा ठेव पावती देण्यात येते. विवाह सोहळा शिस्तबध्द व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रतिष्ठानच्या सदस्यांचे वेगवेगळया समित्या गठित केल्या जातात. त्याप्रमाणे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य कार्य करीत असतात. विवाह कार्यासाठी अक्कलकोट येथील वरिष्ठ प्राथमिक शाळा प्रांगण व श्रीमंत निर्मलाराजे कन्या प्रशाला येथे सुमारे ५० हजार वेअर फुटाचे प्रांगण सजविण्यात येते.

विवाह सोहळयाच्या माहितीसाठी लोकमंगल सुपर बझार अक्कलकोट, स्वामी विवेकानंद पतसंस्था व स्वामी विवेकानंद मल्टीस्टेट अक्कलकोट, हन्नूर, किणी, मैंदर्गी, शिरवळ,मादनहिप्परगा (कर्नाटक) येथील शाखेत संपर्क साधावा. विवाह नोंदणी अंतिम तारीख १० मार्च पर्यंत आहे.

या पत्रकार परिषदेस प्रतिष्ठान सदस्य श्री.अशोक येणगुरे, मल्लिकार्जुन मसुती, विलास कोरे, नितीन पाटील सर, विक्रम शिंदे, मल्लिनाथ मजगे, अंकुश चौगुले, मल्लिकार्जुन आळगी, शशिकांत लिंबितोटे, शरणु कापसे, गुरुपादप्पा आळगी, राजकुमार झिंगाडे,परमेश्वर यादवाड, राहुल काळे, सिध्दाराम टाके, चंद्रकांत दसले, प्रकाश पाटील, कुमार पतंगे व पतसंस्था व मल्टीस्टेट कर्मचारी उपस्थित होते.



## पाणीपट्टीत ५० टक्के सूट द्या; स्मार्ट सिटी योजनेच्या कामाची चौकशी करा

### ॲड.यू.एन. बेरिया यांचे महापालिकेसमोर उपोषण

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या वतीने शहराला ४ दिवसाआड पाणी पुरवठा होत असल्याने पाणीपट्टीत ५० टक्के सुट द्यावी. स्मार्ट सिटी योजनेच्या कामाची चौकशी करा यासह विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी माजी महापौर ॲड. यु. एन. बेरिया यांनी आज सोमवारी डॉ. आंबेडकर चौकात एक दिवसीय उपोषण केले.

महापालिकेने मिळकतकरात केलेली जाचक वाढ रद्द करावी, ४ दिवसाआड पाणीपुरवठा करीत असल्याने म.न.पा.च्या ठरावा प्रमाणे पाणीपट्टीत ५० टक्के सुट यावी, माध्यमिक शाळेत शिक्षक पदाच्या रिक्त जागेवर नियुक्त्या करावी, स्मार्ट सिटीच्या कामाची चौकशी करावी अशी मागणी वेळोवेळी केलेली आहे. या सर्व मागण्या व प्रश्न हे सोलापूर शहरातील जनतेच्या जिव्हाळयाच्या असतानाही महापालिका प्रशासनाला गांभीर्य नाही हे स्पष्ट होत आहे,असा आरोप माजी महापौर ॲड. यु. एन. बेरिया यांनी केला आहे.

महापालिका प्रशासनाच्या निषेधार्थ मोर्चा, निदर्शने, घेराव आदी तिव्र आंदोलने करण्यात येतील असा इशारा माजी महापौर ॲड. यु. एन. बेरिया यांनी दिला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष भारत जाधव, यांच्यासह पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

### या मागण्यांसाठी केले आंदोलन

कर आकारणीतील जाचक केलेली करवाढ रद्द करा, ४ दिवसाआड पाणी पुरवठा करीत असल्याने ५० टक्के सुट द्यावी, माध्यमिक शाळातील रिक्त जागेवर शिक्षकांची नियुक्ती करावी, स्मार्ट सिटी योजनेतील कामाची चौकशी करावी.

## रेल्वे स्थानकात किटलीने मारहाण

✔ **सोलापूर** : शहरातील रेल्वे स्थानकात धक्का दिल्याच्या कारणावरून एका चहा विक्री करणाऱ्याने कितलीच्या झाकणांनी केलेल्या मारहाणीत दिपक रामचंद्र पंगुडवाले (वय ३९ रा.न्यु तिर्हेगाव, फॉरेस्ट) हा इसम जखमी झाला. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास प्लॅटफॉर्म क्रमांक एक येथे घडली. त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याला शब्बीर नावाच्या चहावाल्याने मारहाण केली अशी नोंद रेल्वे पोलिसात झाली आहे .

## वक्तृत्वशैली वृद्धिंगत करण्यासाठी वाचन संस्कृती हाच मंत्र : पाटील

✔ सुराज्य/सोलापूर



वाचेल तोच टिकेल या ब्रिदावलीला अनुसरून वाचन संस्कृती माणसाला परिपूर्ण बनविते. वक्तृत्वशैली वृद्धिंगत करण्यासाठी वाचन संस्कृती हाच मंत्र होतो, असा मौलिक सल्ला सांगली जिल्ह्यातील अंजनगावचे रोहित पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला.

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या मेकॅनिकल-सिव्हिल इमारतीच्या प्रशस्त सभागृहात श्रीमान भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान व श्री ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या उद्‌घाटन भाषणात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वालचंद शिक्षण समूहाचे खजिनदार भूषण शहा होते. यावेळी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त पृथ्वीराज गांधी, विश्वस्त पराग शहा, भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानचे सचिव प्रदीप पंडित उपस्थित होते.

प्रास्ता डॉ. मनोहर जोशी यांनी यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. ज्योती वाघमारे यांनी केले. **राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे** : प्रथम क्रमांक : लोखंडे प्रसाद सुहास, द्वितीय क्रमांकः महादवाड साईनाथ नामदेव,

तृतीय क्रमांक : निकम शुभम मधुकर, उत्तेजनार्थ १) बिराजदार अनुष्का यशवंत, उत्तेजनार्थ २) पोपळे काकासाहेब दिगंबर उत्तेजनार्थ ३) चव्हाण रोहन नामदेव या स्पर्धेत महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यातून सुमारे १७० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# निर्भिड पत्रकारितेचा वंचितांवर फोकस असावा : आ. केळकर

## ज्येष्ठ पत्रकार रामहरी तुळशीराम कराड (रूईकर) यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर स्मृती पुरस्कार प्रदान

✔ सुराज्य/पुणे

पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक कार्य होणे खूप आवश्यक आहे. वंचितांच्या समस्यांना उजागर करून त्यांना योग्य न्याय देणे गरजेचे आहे. त्यामुळे पत्रकारिता ही निर्भीड असून ती वंचितांवर फोकस असावी.असे विचार ठाणे येथील कार्यक्षम आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केले.

पत्रकार दिन व मुंबई येथील मराठी वृत्तपत्र लेखक संघ, महाराष्ट्र राज्य संघाच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबई मराठी ग्रंथ संग्रालय , डॉ. सुरेंद्र गावस्कर सभागृह , नायगाव दादर येथ आयोजित पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुकृत खांडेकर हे अध्यक्षस्थानी होते. तसेच, दै. नांदेड एकजूट पुणेचे ज्येष्ठ पत्रकार रामहरी तुळशीराम कराड (रूईकर), वसई विहार मुंबई लोकसत्ताचे ज्येष्ठ पत्रकार सुहास बिराडे , मराठी वृत्तपत्र लेखक संघ, महाराष्ट्र राज्य संघाचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ बिरवटकर, नांदेड एकजूटचे मालक व संपादक धोडोपंत विष्णुपुरीकर हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर



स्मृती पुरस्कार २०२३ हा पुणे येथील दै. नांदेड एकजूटचे प्रतिनिधी रामहरी तुळशीराम कराड (रूईकर) यांना प्रदान करण्यात आला. या व्यतिरिक्त वेगवेगळया क्षेत्रातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

त्यानंतर लोकवृत्तांत या साप्ताहिकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

संजय केळकर म्हणाले, सर्व माध्यमांमध्ये सकारात्मक बातम्यांचे प्रसारण अधिक करावे. जगात खूप चांगल्या गोष्टी घडत असतात त्यावर माध्यमांनी लक्ष द्यावे. माध्यम जगातून प्रिंट मिडिया कधी ही संपणार नाही. डॉ. सुकृत खांडेकर म्हणाले, वर्तमान काळात प्रिण्ट व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांसमोर सोशल मिडियाचा खूप मोठा धोका आहे. परंतु हे ही सत्य आहे की प्रिण्ट माध्यमे कधी ही बंद पडणार नाहीत.

प्रत्येक व्यक्तीच्या हातात मोबाइल असल्यामुळे तो पत्रकाराची भूमिका पार पाडत आहे. यात चांगल्या आणि वाईट गोष्टींचा प्रसार ही मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. महाराष्ट्र राज्य संघाचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ बिरवटकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकार क्षेत्रात कार्यरत पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# आपत्ती निवारण प्रशिक्षण गरजेचे : मोहिते-पाटील

## तीन दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयीच्या राष्ट्रीय कार्यशाळेचा शुभारंभ

✔ सुराज्य/अकलूज

**अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे जीवित व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत असते यातून बचावासाठी आपत्ती निवारण प्रशिक्षणाची गरज असून तीन दिवसीय कार्यशाळेत एनडीआरएफच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिकासह प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभघेणे गरजेचे असल्याचे मत शिवरत्नचे कार्यकारी अध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.**

शिवरत्न शिक्षण संस्था, श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, सोलापूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयी राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या शितलदेवी मोहिते पाटील, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समिती भारत सरकार यांचा संघ मार्गदर्शक इन्स्पेक्टर ब्रिजेश कुमार राईकवर, सब इंस्पेक्टर अजयकुमार यादव, हेड कॉन्स्टेबल दिलीप थोरात, राजेंद्र ठाकरे, अंकल जी सिद्धराम, वैभव सादाळे, डॉ.विश्वनाथ आवड, धर्मराज दगडे, पराग गायकवाड, शितल मगदूम, आश्रफ शेख, अरविंद कुंभार, महेश ढेंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी, विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल रिसर्च, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समिती भारत सरकार यांचा सहभाग आहे. या कार्यशाळेत भूकंप, महापूर, चक्रीवादळ, अतिवृष्टी अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये होणारी जीवित वित्तहानी टाळण्यासाठी प्रशासकिय यंत्रणा राबवली जात असली तरीही संकटकालीन परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी लोक सहभागी तितकाच महत्त्वाचा आहे यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक स्वरूपात योग्य मार्गदर्शन केले जाणार आहे.प्रास्ताविक अनिल लोंढे तर सूत्रसंचालन धनश्री हातोळकर यांनी केले.

### आपत्ती निवारणात प्रशिक्षित नागरिकांची गरज : ब्रिजेशकुमार राईकवर

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद बल हे देशात कोठेही नैसर्गिक संकट आल्यास त्वरेने धावत जीवित व वित्तीय नुकसान वाचवते, परंतु या कामी नागरिकांचे सहकार्य व सहयोग गरजेचे असून त्यासाठी प्रशिक्षण देऊन नागरिकांत प्रबोधन केल्यास हानी कमी होणेस मदत होते. म्हणून या तीन दिवशीय कार्यशाळेत प्रात्यक्षिकावर भर देत प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती संघ मार्गदर्शक इन्स्पेक्टर ब्रिजेश कुमार राईकवर यांनी दिली.

# जयवंतराव सावंत प्रतिष्ठानच्यावतीने सामुदायिक विवाह सोहळा दिमाखात



✔ सुराज्य/माढा

वाकाव येथील जयवंतराव सावंत प्रतिष्ठानच्या वतीने माढा येथे आयोजित २३ व्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये ११ जोडप्यांनी रेशीमगाठी बांधल्या. सावंत प्रतिष्ठानच्या वतीने माढ्यातील तुळजाभवानी मंगल कार्यालयात रविवार ८ जानेवारी रोजी विवाहसोहळा दिमाखात पार पडला.

यामध्ये ३ आंतरजातीय विवाह संपन्न झाले.नववधूवरांच्या संसारोपयोगी साहित्यासह मणीमंगळसूत्र व कपड्यांचा खर्च प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आला. आलेल्या सर्व वऱ्हाडी मंडळींना भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. राज्याचे आरोग्यमंत्री प्रा डॉ.तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भैरवनाथ शुगरचे चेअरमन तथा बाळासाहेबांची शिवसेना जिल्हा समन्वयक प्रा शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत माजी तालुका पंचायत समिती सदस्य पृथ्वीराज सावंत भैरवनाथचे कार्यकारी संचालक अनिल सावंत केशव सावंत ऋतुराज सावंत यांच्यासह सर्व सावंत परिवार आणि प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. विवाह सोहळ्यानिमित वधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी श्री संत कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, दुध संघाचे माजी संचालक राजेंद्र चवरे, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदराव कानडे, युवा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, जिल्हा प्रमुख चरणराज चवरे, तालुका प्रमुख मुन्ना साठे, शहर प्रमुख भैय्या खरात, अरविंद खरात, वाकाव जि प शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय ढेरे आदिसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्याचे आरोग्य मंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या सूचनेनुसार सोनारी ता परांडा येथे दरवर्षी होणारा विवाह सोहळा ज्या त्या ठिकाणी स्थानिक स्तरावर घेण्यात आला आहे.यामुळे वधूवरांसह त्यांच्या नातेवाईकांना लग्नसमारंभास उपस्थित राहणे सोपे झाले. तीन आंतरजातीय विवाह झाल्याने सामाजिक एकोपा वाढीस मदत होणार असून ही सामाजिक परिवर्तनाची नांदी म्हणावी लागेल.

**- प्रा शिवाजीराव सावंत**
जिल्हा संपर्क प्रमुख शिवसेना शिंदे गट




## साठे प्रशालेतील १५ विद्यार्थ्यांचे सायन्स ऑलंम्पियाड परीक्षेत उत्तुंग यश

✔ **माढा** : सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेतील इयत्ता ६ वी ते १० वीच्या १५ विद्यार्थ्यांनी सायन्स आलंपियाड फाऊंडेशन नवी दिल्ली आयोजित इंटरनॅशनल मॅथ्स, इंग्लिश, व सायन्स आलंपियाड परीक्षेत उत्तुंग यश मिळवीत गोल्ड सिल्वर व ब्रांझ मेडल प्राप्त केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यामध्ये विराज नागेश खेडकर कु हर्षा बालाजी भांगे पृथ्वीराज संतोष भराटे कु नेहा बाळासाहेब भांगे प्रणव सोमनाथ शिंदे यांनी गोल्ड मेडल ऋग्वेद सुहास जोशी यश धनंजय नरवणे ईश्वरी दत्तात्रय कांबळे सिद्धी ज्योतिराम परबत यांनी सिल्वर मेडल तर कृष्णा संदीप ढेकळे पार्थ विशाल साठे समर्थ संतोष लोंढे वेदांत शशिकांत उकिरडे सत्यशील धैर्यशील भांगे ब्राँझ मेडल अशी पदके मिळवली आहेत. या विद्यार्थ्यांचे युवक नेते दादासाहेब साठे, नगराध्यक्षा ॲड. मिनलताई साठे, जिल्हा परिषद सदस्य रणजितसिंह शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार, नाना भांगे, गटशिक्षणाधिकारी बंडू शिंदे, मुख्याध्यापक नागेश खेडकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धैर्यशील भांगे, उपाध्यक्षा लिनाताई राऊत, पर्यवेक्षक के डी यादव यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षिका शीतल चव्हाण, हेमा गायकवाड, मिनाक्षी काशीद, शिक्षक लक्ष्मण राऊत, किरण शेलार, साधना जगताप आदींचे मार्गदर्शन लाभले.



## शिलाई मशीन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्र

✔ सुराज्य/सोलापूर

मुळेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे महिला मेळावा तथा औद्योगिक शिलाई मशीन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभात आ.प्रणिती शिंदे यांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ३० महिलांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आलं.

कार्यक्रमात बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या, आज समाजामध्ये महिलांचे प्रश्न मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु त्या महिला अनेक वेळा व्यक्त करीत नाहीत. त्यामुळे महिला वरील दिवसेंदिवस अन्याय वाढत आहे. महिलांनी आपल्यावरील अन्याय दूर करायचा असेल तर समोर यायला पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थाने क्रांती होते. विशेष म्हणजे महिला वरील विषयावर महिलांनीच बोलावे असे काही नाही पुरुषांनी देखील समोर यायला पाहिजे. त्यासाठी महिलांनी आपला उंबरठा ओलांडून छोटे मोठे व्यवसाय घर खर्चासाठी शिवणकाम सुरू केले तर महिलांची प्रगती होऊ शकते. त्यासाठी महिलांनी जे काही उत्पादन केले आहे ते चांगल्या प्रतीचे असले पाहिजे. त्या उत्पन्नाला बाजारपेठेत चांगली मागणी आहे.

त्यामुळे एखाद्या गावात महिला पुढे येत असतील तर खरी प्रगती तिथूनच होत असल्याचेही याप्रसंगी शिंदे यांनी सांगितले तसेच गावातील तंटे सामोपचाराने मिटवत असताना दुसरीकडे महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देणाऱ्या महात्मा गांधी तंटामुक्त समिती ला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले. कार्यक्रमाचचे आयोजक, तंटामुक्त समिती अध्यक्ष, नितीन बनसोडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की हा उद्योग महात्मा गांधी तंटामुक्त समिती मुळेगाव यांच्या वतीने सुरू करण्यात आला आहे. त्यासाठी अनेकांचा हातभार लागला आहे. या उद्योगाच्या माध्यमातून अनेक महिला आत्मनिर्भर होऊन शिवणकामातून चार पैसे मिळवित असल्याचे समाधान असल्याचे सागितले. यावेळी उपसरपंच शिवराज जाधव, ग्रामपंचायत सदस्य गणेश काकडे, किसन नागटिळक, श्रीशैल म्हेत्रे, बालाजी बनसोडे, बसवराज स्वामी, ग्रामपंचायत सदस्य, सीमा बनसोडे, भौरम्मा माळी, शिवगंगा वाघमारे, संध्या दुपारगुडे, फर्जना मुलाणी, माधुरी काकडे आकांक्षा गायकवाड, अरुण पाटील, अमृता बनसोडे, गुलाब शेख, ब्रम्हनाथ बनसोडे, महेश शेंडगे आदी उपस्थित होते.

## भावकीतील दोन गटात मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर

आमच्या शेतात शेळ्या का राखतो? या कारणावरून चव्हाण यांच्या भावकीतील दोन गटात काठी दगड आणि लोखंडी गजाने झालेल्या मारहाणी २ महिलासह चौघेजण जखमी झाले.

ही घटना वैरागवाडी (ता.मोहोळ) येथे रविवारी घडली. छाया बंडू चव्हाण (वय ४५) आणि बंडू माणिक चव्हाण (वय ६० दोघे रा. वैरागवाडी) असे पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. त्यांना विभीषण चव्हाण, ईश्वर चव्हाण आणि ज्ञानेश्वर चव्हाण या तिघांनी काठी, दगडाने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील विभीषण माणिक चव्हाण (वय ५०) त्याची पत्नी सुमन चव्हाण (वय ४५) अशी जखमींची नावे आहेत. बंडू चव्हाण त्याचा मुलगा विश्वास चव्हाण आणि अन्य दोघांनी लोखंडी गज आणि काठीने मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## अकलूज येथे १७ व्या राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेला प्रारंभ

✔ **अकलूज** : अकलूज येथील संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या वतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्त १७ व्या राज्यस्तरीय लेझीम स्पर्धे ला प्रारंभ झाला. विजय चौक अकलूज येथे आयोजित केलेल्या स्पर्धेचे उद्घाटन अकलूज नगर परिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मित्र मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सयाजीराजे मोहिते पाटील, माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील, शि.प्र. मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, लक्ष्मणराव आसबे, सुभाष दळवी, सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेव अंधारे, जि. प. सदस्या सुनंदाताई फुले यांचे सह सहकार महर्षी साखर कारखाना, शिक्षण प्रसारक मंडळ, पं.समिती,जि.प. यांचे आजी-माजी सदस्य व विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याधिकारी दयानंद गोरे म्हणाले, लेझीम हा महाराष्ट्राचा पारंपारिक खेळ आहे. अकलूज मध्ये या खेळाची जोपासना होते हे कौतुकास्पद आहे. मुलांना मोबाईल पासून अलिप्त करण्यासाठी मैदानी खेळाची आवश्यकता आहे. प्रस्ताविकात शकील मुलाणी म्हणाले, मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाने या स्पर्धेतून आजपर्यंत सुमारे ५० हजार विद्यार्थी खेळाडू तयार केले असून या लेझीम खेळाची गिनीज वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. या स्पर्धेत प्राथमिक गट ४ संघ, ग्रामीण अ गट मुले ६, मुली८, ग्रामीण ब मुले ६, मुली १३, शहरी गट मुले ५, मुली ७ खुला गट मुले ४, मुली २ अशा एकूण ५५ संघांतून सुमारे २२०० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेच्या उद्घाटनाचा प्रारंभी चक्रेश्वर विद्यालय चाकोरे या संघाने आपला खेळ सादर केला. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी, इलाई बागवान यांनी केले. स्पर्धे साठी मंडळातील सर्व सदस्य पदाधिकारी कार्यरत आहेत.



## इंग्लिश स्कूल, वेळापूर प्रशालेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

✔ **वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस व येथील इंग्लिश स्कूल वेळापूर जूनियर कॉलेज व शिवतेज प्राथमिक शाळा वेळापूर प्रशालेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. दि .४ रोजी सकाळी ८ वा फनीगेम्स सुरुवात झाली . या क्रार्यक्रमाचे उदघाटन कार्याध्यक्ष बापूराव सावळे यांच्या हस्ते व सावित्रीबाई फुले व स्व दलितमित्र कदम गुरुजी यांच्या प्रतिमेचे पुजन करून झाले . त्यानंतर सकाळी११ वा . सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्या हस्ते करण्यात आले . या कार्यक्रमासाठी शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष मिलिंद सरतापे , वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे हे ही उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमात वैयक्तिक डांन्स, समुहनृत्य, नाटक, स्टेज गीत सादर करण्यात आले हा कार्यकम ११ ते ५ या वेळेत संपला. दुसऱ्या दिवशी दि ५ सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन स्कूल कमिटी चेअरमन प्रतापराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले . विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम ११ ते ५ या वेळेत झाला. दि. ६या दिवशी शेला पागोटे व अल्पोपहार हा कार्यक्रम सकाळी ८ ते १० या वेळेत झाला ६ रोजी पारितोषिक वितरण सोहळा सकाळी ठीक १० वा . प्रमुख पाहुणे प्राचार्य. डॉ महेंद्र कदम यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे सहसचिव श्रीधर भोसले हे होते . सुरुवातीला मुख्याध्यापक आर बी पवार यांनी अहवाल वाचन केले तर केदार देशमाने यांनी विविध शाखातून आलेल्या शुभ संदेशाचे वाचन केले. संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ सौ मीनाताई कदम, सतिशराव माने दे, अमृतराज माने देशमुख, जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे, प्रतापराव पाटील, पिसेवाडी सरपंच मोहन भाकरे, धानोरे सरपंच नाईकनवरे, मिलिंद सरतापे, गोपाळआबा क्षीरसागर, रामचंद्र पाचपुंड, शुभांगी काळे पाटील, कांचन साठे, उमेश पोरे, केदार देशमाने, प्रशालेचे मुख्याध्यापक पवार आर बी, उपमुख्याध्यापक सुनिल खंदारे, पर्यवेक्षक पठाण शिवशरण हे ही उपस्थित होते. संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ मीनाताई कदम, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीधर भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. त्या नंतर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, विभागीय, जिल्हा स्तरावर गेलेल्या सर्व खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार गोपाळ जगताप यांनी तर सूत्रसंचालन देवकते, बाबर यांनी केले.

## पिसेवाडी ग्रामपंचायत उपसरपंचपदी भाऊसाहेब पिसे बिनविरोध

✔ सुराज्य/वेळापूर



पिसेवाडी ग्रामपंचायत उपसरपंच निवडणुकीत सत्ताधारी गटाचे भाऊसाहेब पिसे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

नुकतीच झालेल्या पिसेवाडी ग्रामपंचायत निवडणुकीत जय वाघजाई ग्रामविकास पॅनलने शिवामृत दूध संघाचे संचालक व माजी सरपंच सुरेश पिसे, सहकार महर्षी कारखाना माजी संचालक महादेव भाकरे, माजी सरपंच अण्णासाहेब शेंडे यांच्या नेतृत्वाखाली लढून झालेल्या तीरंगी निवडणुकीत सरपंचद मोहन भाकरे व ११ पैकी ६ जागा जिंकून पिसेवाडी ग्रामपंचायत वरील सत्ता कायम ठेवली आहे. ९ जानेवारी २०२३ रोजी झालेल्या उपसरपंचपद निवडणुकीत सत्ताधारी गटाकडून भाऊसाहेब पिसे यांचा उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज आल्याने पिसेवाडी ग्रामपंचायत निरीक्षक वैभव बर्वे यांनी उपसरपंचपदी भाऊसाहेब पिसे यांची निवड बिनविरोध जाहीर केली. या कामी पिसेवाडी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी सचिन बनकर यांनी निवडणूक कार्यक्रम पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

उपसरपंच निवडीसाठी पिसेवाडी सरपंच मोहन भाकरे, सदस्य धनाजी साठे, पुष्पा पिसे ,रुक्मिणी पिसे, सुवर्ण राऊत, मोनिका सुळे, संगीता काळे, नागेश जानकर, साहिल आतार, रमेश भाकरे आदी. उपस्थित होते. तर एक ग्रामपंचायत सदस्य अनुपस्थित राहिला. अध्यासी अधिकारी तथा नूतन सरपंच मोहन भाकरे यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानले. यावेळी नुतन सरपंच, नूतन उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, निवडणूक अधिकारी ,पोलीस कर्मचारी या सर्वांचा सुरेश पिसे, अशोक भाकरे, आण्णासाहेब शेंडे, सौ मोनिका शेंडे, यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. निवडीच्या कार्यक्रमाला पिसेवाडी येथील मान्यवर, जेष्ठ नागरिक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## युवा भीमसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त बुधवारी समाज परिवर्तन मेळावा

✔ **सोलापूर** : युवा भीम सेनेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त युवा भीमसेन महाराष्ट्र राज्य सामाजिक पुरस्कार वितरण सोहळा व समाज परिवर्तन मेळाव्याचे आयोजन बुधवार दिनांक ११ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता रंगभवन चौक जवळील समाज कल्याण केंद्र येथे आयोजित केला असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष महेश डोलारे यांनी दिली. याप्रसंगी सामाजिक कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सामाजिक पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. परिवर्तन मेळाव्यात अविनाश वाघमारे व विनोद बेंगळे यांच्यासह मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे, असेही डोलारे यांनी सांगितले.

# वेळापूर ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा दिमाखात संपन्न

✔ **वेळापूर** : माळशिरस तालुक्यातील वेळापूर गावच्या ग्रामपंचायतच्या नूतन सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा पदग्रहण सोहळा व माजी ग्रामपंचायत सदस्यांचा निरोप समारंभ सोहळा आज सकाळी ग्रामपंचायत कार्यालय वेळापूर या ठिकाणी दिमाखात पार पडला.

यावेळी ग्रामपंचायत परिसरात सर्व नुतन सदस्यांचे आगमन निमित्त ग्रामपंचायत परिसर सजावट करून, रांगोळी, काढण्यात आली होती. सर्व सदस्यांचे आगमन होताच फटाक्यांची अतिशबाजी, व फुलांचा वर्षाव करून सर्वांचे स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाचे नेते तथा ग्रामपंचायतचे मार्गदर्शक उत्तमराव जानकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाइंजे त्याचबरोबर अन्य मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न झाला.

वेळापूरचे नूतन सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, गटनेते संजय मंडले यांच्यासह सर्व सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करून त्यांनी आज वेळापूर ग्रामपंचायत येथे कामकाज सुरू केले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी माजी सरपंच विमलताई जानकर उपसरपंच जावेद मुलाणी व सर्व माजी सदस्यांना निरोप देण्यात आला. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी जी. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, माजी सरपंच



विमलताई जानकर, रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, माणिक अण्णा चव्हाण, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, गटनेते संजयआबा मंडले,बापू मुंगुसकर, प्रियंका आडत, हनुमंत वायदंडे, छाया अरुण साठे, विमल बाबासाहेब जाधव, सीमा रायचंद खाडे, सिमरण मुलाणी, अंजना बाबासाहेब माने, ग्राम विकास अधिकारी सचिन बनकर तसेच संदीप माने देशमुख, हनुमंत कदम, संजय देशपांडे, निवृत्ती भुसारे, जब्बार मुलाणी, विश्वास वाघे, काशिनाथ आडत ,सुखदेव आडत, शंकर आडत, जीवन वाघे, शिवाजी मोहिते, महादेव म्हेत्रे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा उपाध्यक्षा सौ अश्विनी भानवसे, विनायक चंदनशिव, लक्ष्मण माने देशमुख, रघुनाथ गोलारे, पोपटराव जानकर, अमोल पनासे,शिवप्रसाद देशपांडे, गणेश साठे, रायचंद खाडे, डॉक्टर धनंजय जानकर ,अशोक बनसोडे, संजय माने, बंडू घोरपडे, चंदू पोळ, विजयभाऊ बनसोडे, रणजीत सरवदे, नारायण साठे, दत्तू साठे, बाबासाहेब कांबळे, चैतन्य इनामदार, रवींद्रकाका चव्हाण, भानुदास चव्हाण, मोहन चव्हाण, राहुल सराटे, विठ्ठल माने, रणजित बनसोडे, विलसन बनसोडे, नागेश क्षीरसागर, सिकंदर कोरबू, धनंजय शिवपुजे, अभिजीत साठे यांच्यासह कार्यक्रमाला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कायक्रमाचे प्रास्ताविक रणजित सरवदे यांनी केले तर आभार सरपंच रजनीश बनसोडे यांनी मानले.

# देशात महागाईची चाहूल

## अर्थसंकल्पानंतर ३५ वस्तू होणार महाग; दागिन्यांपासून ते प्लास्टिकपर्यंत अनेक वस्तूंचा समावेश

सुराज्य/नवी दिल्ली

**देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमन या १ फेब्रुवारीला वर्ष २०२३-२४ चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. यावेळी अनेक सामानांवर आयात कर वाढविण्याची घोषणा केली जाऊ शकते. 'इकोनॉमिक टाइम्स'ने दिलेल्या वृत्तानुसार ३५ पेक्षा अधिक सामानांवर आयात कर वाढविला जाऊ शकतो. विविध मंत्रालयांकडून घेतलेल्या माहितीनुसार केंद्र सरकारने सामानांची एक यादी तयार केली आहे. आयात कमी करुन या वस्तूंचे देशातच उत्पादन वाढविण्यासाठी आयात कर वाढविला जाण्याची शक्यता आहे. यामुळे सरकारच्या आत्मनिर्भर भारत मिशनला बळ मिळेल, असे सरकारतर्फे सांगण्यात येत आहे. मागच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात देखील सरकारने अनेक बाबींवरील आयात कर वाढविला होता.**

देशाच्या चालू खात्यातील तोटा सप्टेंबरच्या तिमाहीत मागच्या नऊ वर्षांच्या तुलनेत उच्चांकी स्तरावर पोहोचला आहे. सप्टेंबरच्या तिमाहीत तोट्याचा जीडीपीमधील वाटा हा ४.४ टक्के होते, जो आधीच्या तिमाहीत फक्त २.२ टक्के एवढाच होता. नुकतेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थेने वर्ष २०२३ मध्ये जगाचा एक तृतीयांश भाग हा मंदीच्या सावटाखाली येणार असल्याचे म्हटले आहे. यामध्ये अमेरिकेसोबतच युरोपमधील काही देश सामील आहेत. या मंदीचा फटका भारताला सुद्धा बसू शकतो, अशी शक्यता आहे. कारण विकसित देशात मंदी आल्यास त्याचा परिणाम भारताच्या निर्यातीवर होऊ शकतो. पुढील वर्षी चालू खात्यातील तोटा हा जीडीपीच्या ३.२ ते ३.४ टक्के राहण्याची शक्यता आहे.

सुत्रांच्या माहितीनुसार आयात कर वाढविणे हा सरकारच्या दीर्घ योजनेचा भाग आहे. सरकार देशातच या वस्तूंचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करणार आहे. २०१४ साली जेव्हा 'मेक इन इंडिया' हे अभियान सुरु करण्यात आले. तेव्हापासून अनेक वस्तूंवर आयात शुल्क वाढविले गेले आहे. मागच्या वर्षी इमिटेशन ज्वेलरी, ईअर फोन आणि त्याआधी सोन्यावर आयात कर वाढविला गेला होता.

२०२३ - २४ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प लोकसभेमध्ये १ फेब्रुवारी (बुधवारी) सकाळी ११ वाजता सादर केला जाईल. अर्थसंकल्प सादर करण्यात येण्याच्या एक दिवस आधी ३१ जानेवारीला निर्मला सीतारमन आर्थिक सर्वेक्षण सादर करतील. केंद्रीय वित्त मंत्रालय आणि नीती आयोग, इतर संबंधित मंत्रालयांशी सल्ल्याने अर्थसंकल्प तयार केला जातो. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर नवे आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी म्हणजेच १ एप्रिलपूर्वी दोन्ही सभागृहांकडून तो मंजूर केला जातो.



### या वस्तू महाग होण्याची शक्यता

वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने डिसेंबर महिन्यात विविध मंत्रालयांना अत्यावश्यक वस्तूंमध्ये येत नाहीत, अशा वस्तूंची यादी तयार करण्यास सांगितले होते. सरकार या सामानांवर कर वाढवून त्यांची आयात कमी करण्याचा प्रयत्न करणार आहे. या वस्तूंच्या यादीमध्ये खासगी विमानं, हेलिकॉप्टर्स, महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, प्लास्टिकचे सामान, हाय ग्लास पेपर, दागिने, विटामिन्स असा वस्तूंचा समावेश आहे.

## मोदी स्वतःच करतात स्वतःच्या आरोग्याचा खर्च

सुराज्य/नवी दिल्ली



**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ साली सत्तेत आल्यापासून जगभरात त्यांच्याविषयी चर्चा होत असते. पहिल्यांदा शपथ घेतल्यापासून ते आजतागायत मोदींचे परदेश दौरे अनेकदा चर्चेचा विषय ठरले आहेत. सतत परदेश वाऱ्यांमुळे विरोधक त्यांच्यावर टीका करत असतात. या परदेश दौऱ्यातून देशाच्या तिजोरीवर आर्थिक भार पडत असल्याचेही विरोधक सांगत असतात. भाजपा आणि स्वतः मोदींनी या आरोपांना फार महत्त्व दिले नाही. उलट मोदीजी दिवसांचे १८ तास काम करत असल्याचा प्रचार भाजपाकडून केला जातो. एवढे तास काम करुनही पंतप्रधान मोदी या वयात आजारी पडले तर त्यांचा उपचाराचा खर्च कोण करतं? असा प्रश्न पडणं स्वाभाविक आहे. पुण्यातील आरटीआय कार्यकर्ते प्रफुल्ल सारडा यांना देखील हा प्रश्न पडला आणि त्यांनी सरळ पंतप्रधान कार्यालयात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली.**

देशाचे पंतप्रधान हे देशात आणि परदेशात दौऱ्यावर असताना त्यांच्या वैद्यकीय उपचाराचा खर्च कुणाकडून केला जातो? असा प्रश्न आरटीआयद्वारे विचारला गेला. यावर उत्तर देत असताना पंतप्रधान कार्यालयाने स्पष्ट केले की, २०१४ पासून आतापर्यंत मोदींच्या वैद्यकीय खर्चापोटी पंतप्रधान कार्यालयाने एकही रुपया खर्च केलेला नाही. खरंतर आपल्याकडे खासदार आणि केंद्रीय मंत्र्यांना अनेक सोयी-सुविधा पुरविल्या जातात. पंतप्रधानांना देखील अनेक सुविधा योजलेल्या आहेत. तरीही मोदींनी आतापर्यंत स्वतःचा वैद्यकीय खर्च स्वतःच केला आहे. सरकारच्या तिजोरीतून आजवर एकही रुपया खर्च झालेला नाही.

पंतप्रधान कार्यालयातील सचिव विनोद बिहारी सिंह यांनी प्रफुल्ल सारडा यांच्या या आरटीआय अर्जाला उत्तर देताना सांगितले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वैयक्तिक वैद्यकीय उपचारासाठी सरकारने तरतूद केलेली असते. मात्र, याचा विनियोग आजवर करण्याची वेळ आलेली नाही. पंतप्रधान कार्यालयातील माहितीनुसार मोदींवर उपचारासाठी आजवर खर्च झालेला नाही, असेही त्यांनी कळविले.'

### ११५ वर्षांच्या इतिहासातला सर्वात मोठा धक्का

## स्विस नॅशनल बँकेला १४३ अब्ज डॉलर्सचा तोटा

सुराज्य/नवी दिल्ली

**स्विस नॅशनल बँकेला २०२२ मध्ये १३२ स्विस फ्रँक म्हणजेच १४३ अब्ज डॉलर्सचा वार्षिक तोटा झाला आहे. सोमवारी ही बाब सांगण्यात आली. या बँकेच्या ११५ वर्षांच्या इतिहासात हा सर्वात मोठा तोटा आहे. शेअर आणि बॉण्ड पोर्टफोलिओच्या मूल्यात घट झाल्याने हा तोटा झाला आहे. या घटनेमुळे बाजारात तेजीत असलेल्या स्विस फ्रँकचाही नकारात्मक परिणाम झाला.**

स्विस नॅशनल बँक या प्रकरणात ६ मार्चला तपशीलवार आकडेवारी जाहीर करणार आहे. स्विस फ्रँक कमकुवत झाला याची विविविध कारणे आहेत. स्विस बँकेने ८०० अब्ज किंमतीचे स्टॉक्स आणि बॉण्ड्स यामध्येच १३१ अब्ज फ्रँकचं नुकसान झालं. जागतिक शेअर बाजारात मंदी आली. त्यामुळे रोखीच्या किंमती गेल्या वर्षी घसरल्या. यामुळे स्विस नॅशनल बँकेसह सगळ्यात बँकांनी महागाईचा सामना करण्यासाठी व्याजदर वाढवले. मात्र हे देखील तोट्याच्या दिशेने घेऊन जाणारं कारण ठरलं. रॉयटर्स या वृत्तसंस्थेने यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.

या सगळ्या घटनेत एकच सकारात्मक बाब ही ठरली की स्विस नॅशनल बँकेचं सोनं २०२१ च्या शेवटी १०४० टन इतकं होतं आणि २०२२ मध्ये बँकेचे ४०० दशलक्ष फ्रँक वाढले. २०२२ मध्ये जो तोटा बँकेला झाला आहे त्यामुळे आता ही बँक केंद्र आणि राज्य सरकारांना नेहमीचं पे आऊट करणार नाही. गेल्यावर्षी स्विस नॅशनल बँकेने ६ अब्ज फ्रँक दिले होते.

इतकं प्रचंड नुकसान झालं असलं तरीही त्याचा बँकेच्या धोरणांवर काहीही परिणाम होणार नाही. २०२२ मध्ये चेअरमन थॉम जॉर्डन यांनी स्विस चलनवाढ रोखण्यासाठी व्याजदरांमध्ये तीनदा वाढ केली होती असं विश्लेषकांनी म्हटलं आहे.

## बेकायदा फ्लेक्सकडे दुर्लक्ष; सहाय्यक आयुक्तांना दंड

सुराज्य/पुणे : फ्लेक्सकडे दुर्लक्ष करणाऱ्या परिमंडळ दोनमधील तीन सहायक (क्षेत्रीय) आयुक्तांवर महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. या सहायक आयुक्तांना प्रत्येकी एक हजार रुपये दंड व सेवापुस्तिकेत नोंद अशी शिक्षा करण्यात आली आहे. त्याचबरोबर आता परिमंडळ चारमधील सहायक आयुक्तांवरही अशीच कारवाई प्रस्तावित असल्याची माहिती महापालिकेतर्फे देण्यात आली आहे.

परिमंडळ दोन अंतर्गत शिवाजीनगर-घोले रस्ता क्षेत्रीय कार्यालय, औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालय, कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयाच्या सहायक आयुक्तांवर कारवाई करण्यात आली आहे. यापुढे परिमंडळ चारमधील वानवडी-रामटेकडी, हडपसर-मुंढवा आणि कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय आयुक्तांवरील कारवाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## नाचणीच्या बियाणांची विक्रमी निर्यात

सुराज्य/पुणे

**देशात अद्यापही पिझ्झा, बर्गरसारखे जंकफूड खाण्याची क्रेझ आणि ट्रेंड कायम असताना. युरोप, आखाती देश आणि जपानने सर्वाधिक पौष्टिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तृणधान्यांच्या बियाणांची भारतातून विक्रमी आयात केली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये देशातून जगभरातील देशांना ४८० कोटी रुपये किंमतीच्या बियाणांची निर्यात करण्यात आली आहे.**



चालू वर्ष जागतिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर बियाणांच्या निर्यातीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जगभरात तृणधान्यांविषयी जागृती वाढत आहे. त्याचा परिणाम म्हणून जगभरातून ज्वारी, बाजरी आणि नाचणीच्या बियाणांना मागणी वाढली आहे. विशेषकरून आखाती देश, जपान, जर्मनी आणि युरोपीयन देशांनी बियाणांची आयात करून आपआपल्या देशांत तृणधान्य उत्पादन करण्याचे धोरण आखले आहे.

२०२१-२२ या आर्थिक वर्षांत १०१ कोटी रुपयांच्या तृणधान्यांची निर्यात झाली आहे. पण, एकूण ४८० कोटी रुपये किंमतीचे बियाणांची निर्यात झाली आहे. म्हणजे तृणधान्यांच्या निर्यातीपेक्षा बियाणांची निर्यात वाढली आहे. जगभरातील देशांनी तृणधान्ये आयात करण्यापेक्षा आपआपल्या देशात तृणधान्यांचे उत्पादन वाढविण्याचे धोरण आखले आहे.

## झुकणे माझ्या रक्तात नाही : पंकजा मुंडे

सुराज्य/नाशिक : कुणापुढे काहीही मागण्यासाठी मी झुकले नाही आणि झुकणारही नाही. माझ्या वडिलांनी आयुष्यभर स्वाभिमानाच्या व्रताचे आचरण केले, त्याचेच मी अनुसरण करीत आहे. त्यामुळे मला राजकारणातून बाहेर पडण्याची भीती नाही,' असा गर्भित इशारा देऊन, माजी ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांनी गेल्या काही वर्षांतील राजकारणातील उलथापालथींवर भाष्य केले. राजकारणातील घडामोडी आणि आयुष्यात न बोलता आलेल्या गोष्टींवर पुस्तक लिहिणार असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

## महाराष्ट्रात पुढचे दोन दिवस थंडीचे

### पुण्यासह सात हाडे गोठणार

सुराज्य/पुणे : राज्यात यंदा थंडीच नाही असे अनेकजण म्हणत असले तरी बऱ्याच जिल्ह्यांमध्ये कडाक्याचा गारवा पाहायला मिळत आहे. हवामान खात्याकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातही तापमानाचा पारा चांगलाच घसरला आहे.



पुढच्या दोन दिवसात तापमानात घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनाही आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, काही ठिकाणी एक अंकी तापमानाची नोंद करण्यात आली आहे. यामुळे पुढच्या २ दिवसात उत्तर मध्य महाराष्ट्रातील काही शहरे, मराठवाडा तसेच विदर्भातही तापमानात घट होण्याची शक्यता आहे. यामुळे पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, जळगाव, धुळे, सोलापूर, नाशिक, परभणी या जिल्ह्यांमध्ये थंडी वाढण्याचा अंदाज आहे.

## शिंदेंच्या खेळीने आठवले झाले नाराज

सुराज्य/मुंबई

ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडीच्या युतीला शह देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पक्षाला सोबत घेण्याचा निर्णय घेतला होता. एकनाथ शिंदेंच्या याच निर्णयावरुन भाजपचा मित्रपक्ष असलेल्या रिपाइंचे प्रमुख रामदास आठवले हे नाराज झाले आहेत. जोगेंद्र कवाडे यांना सोबत घेताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्याशी चर्चा करायला हवी होती. मी सोबत असताना कवाडे यांना घेण्याची गरज नव्हती, असे रामदास आठवले यांनी म्हटले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांना सोबत घेण्यापूर्वी आमच्याशी चर्चा करणे, अत्यंत आवश्यक होते. महायुतीत कुणाला घ्यायचे आहे, कोणत्या पक्षाला घ्यायचे आहे हा महायुतीचा निर्णय असतो. नवीन येणाऱ्या लोकांचे स्वागत आहे. परंतु, आपल्याला विचारामध्ये न घेता थेट घोषणा करण्यात आली हे योग्य नाही, अशी भावनाही रामदास आठवले यांनी बोलून दाखवली.

काही दिवसांपूर्वीच वंचितचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी मुंबई महानगरपालिकेत ठाकरे गट आमच्यासाठी सोडेल तितक्या जागांवर आम्ही लढू, असे जाहीर केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे ठाकरे गट आणि वंचितची युती जवळपास निश्चित मानली जात आहे.

प्रकाश आंबेडकरांच्या या वक्तव्याला काही तास उलटत नाही तोच एकनाथ शिंदे यांनी जोगेंद्र कवाडे यांच्यासोबत पत्रकार परिषद घेऊन युतीची घोषणा केली होती. यावेळी एकनाथ शिंदे यांनी जोगेंद्र कवाडे यांचे कौतुक केले होते. कवाडे हे अभ्यासू आणि आक्रमक नेते आहेत, अशी स्तुतीसुमनेही एकनाथ शिंदे यांनी उधळली होती. मात्र, यामुळे रामदास आठवले नाराज झाले आहेत.

## चौघे नायलॉन मांजाविक्रेते तडीपार

सुराज्य/नाशिक : शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत नायलॉन मांजाची खरेदी-विक्री, साठा, वापर करण्यास मनाई असतानाही त्याची विक्री करताना आढळून आलेल्या चौघांना अंबड पोलिसांनी वीस दिवसांसाठी तडीपार केले आहे.

अजिंक्य प्रदीप मिसे (वय ३४, रा. त्रिमूर्ती चौक, सिडको), बाळासाहेब खंडेराव राहिंज (४१, चरणदास मार्केट, जेलरोड, नाशिकरोड), समाधान राजेंद्र मोरसकर (१९, गणेश चौक, सिडको), हेमंत वीरेंद्र गोला (१९, सिडको) अशी तडीपार करण्यात आलेल्या नायलॉन मांजा विक्रेत्यांची नावे आहेत.

## पुण्यासाठी ॲक्शन प्लॅन

### वातावरणीय बदलांचे धोके टाळण्यासाठी पुणे जिल्ह्याचा आराखडा तयार

सुराज्य/पुणे : वातावरणीय बदलांचे धोके टाळण्यासाठी आवश्यक असलेली शाश्वत उद्दिष्टे मांडणारा पुणे जिल्ह्याचा वातावरण कृती आराखडा (क्लायमेट ॲक्शन प्लॅन) तयार झाला आहे. पुणे जिल्ह्याची भौगोलिक रचना, पर्यावरणीय समस्या, त्यांचे स्रोत, त्यावर होणारा खर्च आणि पर्यावरण संरक्षणासाठी वापरला जाणारा निधी यांचा तौलनिक अभ्यास करून या आराखड्यात प्रमुख क्षेत्रांतील शाश्वत पर्यायाच्या शिफारसी देण्यात आल्या आहेत.

जागतिक पातळीवर भेडसावणाऱ्या हवामान बदलांच्या समस्या रोखण्यासाठी 'संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदल तज्ज्ञ' समितीने शाश्वत विकासाची उद्दिष्टे निश्चित केली आहेत. त्यानुसार भारतासह शंभरहून देशांनी पुढील ५० वर्षांत कार्बन उत्सर्जन रोखण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या धोरणांचे अहवाल समितीला सादर



केले आहेत. केंद्र सरकारने या धर्तीवर देशातील प्रमुख शहरांची 'रेस टू झिरो' या योजनेसाठी निवड केली असून, त्यांनी शहराचा 'क्लायमेट ॲक्शन प्लॅन' तयार करणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्रात यात मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर या शहरांचा समावेश आहे. त्यानुसार राज्यातील पहिला वातावरण कृती आराखड्याचा मान मुंबईने मिळवला. मुंबई महापालिकेने गेल्या वर्षी कृती आराखडा प्रसिद्ध केला. यापाठोपाठ पुणे जिल्हा आणि नागपूर जिल्ह्यांचे वातावरण कृती आराखडे नुकतेच तयार झाले आहेत. दिल्लीतील वसुधा फाउंडेशन'ने शक्ती शाश्वत उर्जा फाउंडेशन'च्या सहकार्याने पुणे जिल्ह्याचा कृती आराखडा करण्यात आला आहे.

# आईचा त्याग, वडिलांची साथ


## १७ वर्षे घरापासून दूर राहून अभिजीत कटके झाला हिंद केसरी

## ताकदीला कल्पकतेची जोड देत प्रतिस्पर्धी मल्लांना दाखविले अस्मान

सुराज्य/पुणे

**पुण्यातील वाघोली येथील मल्ल अभिजीत कटके याने रविवारी हैदराबाद येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत प्रतिष्ठेचा 'हिंद केसरी' किताब मिळवला. भारतीय पारंपरिक शैली कुस्ती संघटनेच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं होतं. अंतिम फेरीच्या लढतीत अभिजीतने हरियाणाच्या सोमवीरचा ४-० असा पराभव करून मानाची गदा उंचावली. अभिजीत हा पुण्यातील शिवरामदादा तालमीत सराव करतो. भूगाव येथे २०१७ मध्ये झालेल्या राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अधिवेशनात त्याने 'महाराष्ट्र केसरी'ची गदा उंचावली होती. त्यानंतर आता अभिजीत हिंद केसरीचाही मानकरी ठरल्याने राज्यभरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. मात्र, एकामागोमाग एक स्पर्धा जिंकणाऱ्या अभिजीत कटकेसह त्याच्या कुटुंबियांनी लाल मातीतील या खेळासाठी मोठा त्यागही केला आहे.**

अभिजीत कटके याने हिंद केसरीचा किताब पटकावल्यानंतर त्याच्या आईला भावना अनावर झाल्या. 'कुस्तीच्या सरावामुळे मागील १७ वर्षांपासून अभिजीत माझ्यापासून दूर आहे. आमचं फक्त हिंद केसरीचंच स्वप्न बाकी होतं आणि अभिजीतने आता तेही पूर्ण केलं आहे. त्यामुळे मला इतका आनंद झाला आहे की तो शब्दांत व्यक्त करता येत नाही. वाघोलीत आल्यानंतर आम्ही त्याचं भव्य स्वागत करू,' असं म्हणत अभिजीत याच्या आईने मुलाच्या यशाचा आनंद व्यक्त केला.



ताकदीला कल्पकतेची जोड देत कुस्त्या जिंकण्याचा अभिजीतचा डाव' काही काळापासून कमालीचा यशस्वी ठरत आहे. युवा महाराष्ट्र केसरी आणि हिंदकेसरी, रुस्तम ए हिंद दोन्ही किताब मिळवणाऱ्या दीनानाथ सिंह, दादुमामा चौगुले, हरिश्चंद्र बिराजदार, विनोद चौगुले व अमोल बुचडे यांच्या रांगेत विराजमान होण्याचा बहुमान अभिजीतने मिळवला आहे.

दरम्यान, भारतीय पारंपरिक शैली कुस्ती संघटनेच्या माध्यमातून होणाऱ्या या स्पर्धेतील अभिजीत पुण्याचा दुसरा हिंद केसरी ठरला.

यापूर्वी हा मान योगेश दोडकेने मिळवला होता. त्याचबरोबर एक वर्ष मॅटवर आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत पुण्याच्याच अमोल बराटेने हिंद केसरीचा मान मिळवला होता.

### कुस्तीचं मैदान गाजवणाऱ्या अभिजीत कटकेचा प्रवास

अभिजीत हा पुण्याच्या गणेश पेठेतल्या शिवरामदादा तालमीचा पैलवान. पैलवान चंद्रकांत उर्फ तात्या कटके यांचा हा मुलगा. अभिजीतच्या रूपाने त्यांच्या घरातील पाचवी पिढी कुस्तीत आहे. अमर निंबाळकर, भरत म्हस्के, हणमंत गायकवाड, गुलाब पटेल यांचे त्याला मार्गदर्शन लाभते. अभिजितने २०१५मध्ये युवा 'महाराष्ट्र केसरी'चा मान मिळवला. त्यानंतर २०१६मध्ये त्याने ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत ब्राँझपदक मिळवले.

## जनकल्याण मल्टिस्टेटला सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार



**सोलापूर** : राष्ट्रवादी प्रदेश सहकार सेलचे उपाध्यक्ष राजेंद्र हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या सोलापुरातील जनकल्याण मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे यांचा सहकार गौरव पुरस्कार -२०२२ सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा गुरुवार, शुक्रवार (१२ व १३ जानेवारी) रोजी शिर्डी येथील पुष्पक रिसॉर्ट येथे होणार आहे. या कार्यक्रमास माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव केंद्रीय विजयकुमार, खा. हेमंत पाटील, खा. धनंजय महाडिक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया संचालक सतीश मराठे, सहकार आयुक्त अनिल कवडे, पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, बुलढाणा अर्बन बँकेचे अध्यक्ष राधेश्याम चांडक, सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री उदय जोशी उपस्थित राहणार आहेत. जनकल्याण यॉं संस्थेची स्थापना ३ जून २०१२ रोजी झाली. गेल्या १० वर्षांत महाराष्ट्रभरात एकूण २७ शाखांचे जाळे विणण्यात आले. आज बँकेने पावणेदोनशे कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा ओलांडला आहे. संस्थेला आयएसओ मानांकन प्राप्त झाले संस्थेची यशस्वी वाटचाल संस्थे अध्यक्ष राजेंद्र हजारे आणि सचिव आशा हजारे यांच्यासह सर्व संचालक अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.



## चंडक प्रशालेचा संघ मिनी ऑलंपिक व महाराष्ट्र केसरीसाठी पुण्याला रवाना

**पुणे** : येथे १० ते १४ जानेवारी व या दरम्यान होणाऱ्या मिनी ओलंपिक डायविंग स्पर्धेसाठी ज.रा. चंडक प्रशालेचे सोहम श्रीकांत शेटे, सागर मदरी या दोघांचा हाय बोर्ड मध्ये निवड झाले व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी गुंडू भोसले, शोभराज दोरकर या दोघांची निवड झालेली आहे. या चौघांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष श्रीमती निर्मलाताई ठोकळ यांनी सत्कार केल्या व पुढील स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रसंगी संस्थेच्या सचिव- श्री सचिन भैय्या ठोकळ, मुख्याध्यापक उदय जाधव, पर्यवेक्षक सुभेदार व क्रीडा शिक्षण दशरथ गुरव उपस्थित होते.

## संभाजी आरमारच्यावतीने मशाल मार्च

**सोलापूर** : १२ जानेवारी १९३१ रोजी सोलापूर शहरातील हुतात्मा मलप्पा धनशेट्टी, हुतात्मा जगन्नाथ शिंदे, हुतात्मा श्रीकिसन सारडा व हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन या चार हुतात्म्यांना ब्रिटिशांनी येरवडा कारागृह येथे फाशीची शिक्षा दिली होती. त्यांच्या बलिदानाच्या तेजस्वी स्मृती जागविण्यासाठी तसेच त्यांच्या पराक्रमी बलिदानाला अभिवादन करण्यासाठी संभाजी आरमारने मशाल मार्च आयोजित केला आहे. बलिदान दिनाच्या पूर्व संध्येला म्हणजे बुधवार ११ जानेवारी रोजी सांयकाळी ६ वा. हुतात्मा मलप्पा धनशेट्टी यांच्या मंगळवार बाजार येथील निवासस्थानी हुतात्म्यांच्या अस्थी कलशाला पुष्पहार अर्पण करून या मार्चचा शुभारंभ होणार आहे, असे श्रीकांत डांगे यांनी सांगितले.

# भाजपच्या पाटलांकडून काँग्रेसच्या नरोटेंचा सत्कार;
# कार्यक्रमाला मिळाली 'उत्तर'च्या राजकारणाची किनार


**सोलापूर** : महापालिका अतिरिक्त आयुक्त म्हणून सोलापूरचे सुपुत्र संदीप कारंजे यांची नियुक्ती झाली. तसेच काँग्रेस पक्षाच्या शहराध्यक्ष पदी चेतन नरोटे यांची निवड झाली. त्या प्रित्यर्थ शहर उत्तरमधील भाजप दोघांचा सत्कार सद्गुरू बसवारुढ स्वामी ट्रस्टचे ईश्वरानंद अप्पाजी व मठाधिपती शिवपुत्र अप्पाजी यांच्या हस्ते करण्यात आला. हा कार्यक्रम शहर उत्तरचे नेते तथा माजी नगरसेवक सुरेश पाटील यांनी घडवून आणला. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे किसन जाधव, माजी नगरसवेक आनंद चंदनशिवे, काँग्रेसचे माजी नगरसेवक बाबा मिस्त्री आदी उपस्थित होते. या सत्कार कार्यक्रमाची सध्या राजकीय वर्तुळात आहे.

सध्या आमदार विजयकुमार देशमुख व सिध्देश्वर कारखान्याचे संचालक धर्मराज काडादी यांच्यात शाब्दिक युद्ध पेटले आहे. हे दोन्ही नेते आता एकमेकांना आव्हान देत आहेत. काडादी यांनी थेट देशमुख यांना आगामी काळात आपली उमेदवारी वाचवावी असे आव्हान दिले आहे. दुसरीकडे सुरेश पाटील आणि आ. देशमुख यांच्यातही फारसे सख्य नाही. सध्या आ. विजयकुमार देशमुख यांच्याकडून सुरेश पाटील यांच्यासह उत्तरमधील ज्येष्ठ नेत्यांना, काही माजी नगरसेवकांना डावलण्याचे काम सुरू असल्याची चर्चा आहे. अनेकवेळा सुरेश पाटील यांनी बोलूनही दाखवले आहे. त्यामुळेच या कार्यक्रमाच्या आडून सुरेश पाटील आ. देशमुख यांच्या विरोधकांना एकत्र आणण्याची तयारी तर करत नाही ना, अशी चर्चा सुरू झाली आहे. या कार्यक्रमाला आनंद चंदनशिवे, किसन जाधव, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री यांच्यासह प्रवीण निकाळजे, रफिक इनामदार, बिपिन पाटील, चेतन गायकवाड, एम के फाउंडेशनचे नागेंद्र कोगणुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

दरम्यान, लहानपणापासूनच बसवारूढ मठ येथे आपण येत आहोत. मठावर आपली अफाट श्रद्धा आणि निष्ठा आहे, अप्पाजींचे सदैव आशीर्वाद आमच्या पाठीशी असल्यानेच आज आपण या पदापर्यंत पोहोचले असल्याचे शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी सांगितले. हा माझ्यासाठी सुवर्णयोग म्हणावा लागेल हा योग माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांनी घडवून आणला. बसवारुढ मठाच्या आणि आपाजींच्या कृपा आशीर्वादाने भविष्यात आपल्याला कार्य करण्यासाठी नवउर्जा आणि प्रेरणा मिळाल्याचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे सांगितले. चेतन नरोटे हे लहानपणापासून मठामध्ये येत आहेत. भविष्यात देखील त्यांच्या हातून चांगले कार्य घडणार आहे त्यासाठी आपले कृपा आशीर्वाद त्यांच्या पाठीशी सदैव आहे तसेच संदीप कारंजे हे कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून आज तागायत कार्य करीत आहेत यापुढे देखील त्यांचे कार्य अखंडित सुरू राहण्यासाठी ईश्वरी कृपा त्यांच्या पाठीशी असल्याचे आशीर्वचन मठाचे संस्थापक श्री ईश्वरानंद अप्पाजी यांनी केलं.

### आम्ही चौघे चांगले मित्र

चेतन नरोटे, आनंद चंदनशिवे, किसन जाधव आणि मी चौघे चांगले मित्र आहोत. आमचे पक्ष जरी वेगळे असले तरी विचार एक आहेत. कार्यक्रमाच्या निमित्ताने आम्ही एकत्र आलो, याचा आंनद आहे, असे सुरेश पाटील म्हणाले.



# समाजात विश्वास निर्माण करा, समाज तुमच्या पाठीशी राहील : अनिल ढवळे

**सुराज्य/सोलापूर**

कोणतीही संस्था निःस्वार्थपणे व पारदर्शकपणे समाजात काम करत असल्यास त्याच्यामागे पूर्ण समाज कायम रहाते असेच काम सोलापूर युबोचे आहे. त्यामुळेच सोलापूर भावसार समाजात एक वेगळीच ओळख व वेगळीच छाप पाडण्यात युबो सोलापूर यशस्वी ठरली आहे. युबो सोलापूरने गेली ३ वर्षे समाजासाठी केलेली कामे निश्चितच कौतुकास्पद आहेत, असे गौरवोद्गार उद्योगपती अनिल ढवळे यांनी काढले. युनायटेड भावसार ऑर्गनायझेशनच्या पद्ग्रहण सोहळ्यात ते बोलत होते.

युनायटेड भावसार ऑर्गनायझेशनचा सोलापूर या शाखेचा अध्यक्ष म्हणून सिद्राम हंचाटे, सचिव रवी लाडे, खजिनदार प्रभाकर कुसुमकर व इतर संचालक मंडळाचा शपथविधी समारंभ आयएमए हॉल येथे पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे उद्योगपती ढवळे, भावसार समाजाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष गिरीश वायचळ ,माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, भावसार युवाचे राष्ट्रीय अध्यक्ष राम सरवदे, युबोचे राष्ट्रीय अध्यक्ष अश्विन डोईजोडे, माजी गव्हर्नर सुहास क्षीरसागर, दीपक आकुडे, राजेश झिंगाडे तसेच ज्योती क्षीरसागर आदी उपस्थित होते. भावसार वैकुंठभूमी तयार करण्यात मोठे योगदान केल्याबद्दल युबार्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. हंचाटे यांनी युबोच्या कार्यास शुभेच्छा देत सर्वतोपरी मदत करायचे आश्वासन दिले. सिद्राम हंचाटे यांनी मावळत्या अध्यक्षा ज्योती क्षीरसागर यांच्याकडून अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला. युबो चे संस्थापक सदस्य तसेच राज्याध्यक्ष गिरीश वायचळ यांनी नूतन अध्यक्ष हंचाटे, सचिव रवी लाडे, खजिनदार प्रभाकर कुसुमकर यांना शपथ दिली. नूतन संचालकांना राष्ट्रीय अध्यक्ष अश्विन डोईजोडे यांनी शपथ दिली. युबो सोलापूर या संस्थेत नव्याने आलेल्या सागर पुकाळे, प्रकाश भांबुरे, अनिता भांबुरे, अतुल रणसुभे, प्रशांत हिबारे व इतर आठ सदस्यांचा शपथविधी सुहास क्षीरसागर यांनी दिला.कार्यक्रमासाठी श्रीकांत रंगदाळ, लक्ष्मीकांत मुसळे, सागर सरवदे, प्रभाकर जवळकर , सुषमा डोईजोडे, रवी वायचळ, संजय पतंगे, माधव वळसे, मेघा पतंगे, ज्योती झिंगाडे यांचा सहभाग होता. या कार्यक्रमास विजय पुकाळे, सरिता जवळकर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुधीर क्षीरसागर यांनी केले तर आभार सचिव रवींद्र लाडे यांनी मानले.

**युनायटेड भावसार ऑर्गनायझेशनचा शपथविधी उत्साहात**




## जानकरांच्या उपस्थितीत उद्या पंढरीत रासपचा मेळावा

**सोलापूर** : राष्ट्रीय समाज पक्षाचा पश्चिम महाराष्ट्र विभागीय पदाधिकारी मेळावा बुधवार, ११ रोजी तनपुरे महाराज मठ पंढरपूर येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री आमदार महादेवजी जानकर प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते, मुख्य महासचिव माऊली सलगर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती राष्ट्रीय समाज पक्ष सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख श्रीमंत हक्के यांनी दिली.



पक्षाचे पुढील ध्येयधोरणे आगामी निवडणुका, गाव तेथे शाखा, नूतन नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार यासह राजकीय प्रश्नावर आ. महादेवजी जानकर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातून ५०० पदाधिकारी मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. मेळाव्याचे आयोजन प.महाराष्ट्रातील सर्व विभागीय, जिल्हा, तालुका पदाधिकारी करत आहेत. सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आव्हान जिल्हा संपर्कप्रमुख श्रीमंत हक्के यांनी केले आहे.

## टॉवरला विद्युत पुरवठा करणाऱ्या बॅटऱ्या पळविल्या

**सुराज्य/सोलापूर**

रिलायन्स जिओ कंपनीच्या टॉवरला विद्युत पुरवठा करण्यासाठी लावण्यात आलेल्या महागड्या चार बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या. राजेश बाबुशा औरादकर (रा.लक्ष्मी बँक कॉलनी, जुळे सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

गुरुकृपा पेट्रोल पंपाच्या पाठीमागे पाटील नगर एमआयडीसी येथे असलेल्या रिलायन्स जिओ कंपनीच्या टॉवरला विद्युत पुरवठ्यासाठी बॅटऱ्या लावल्या होत्या. याठिकाणी असलेला सुरक्षारक्षक व कर्मचारी जागेवर नसल्याचा फायदा घेत चोरट्याने १ लाख ६० हजार रुपये किमतीच्या ४ बॅटऱ्या चोरून नेल्या. तपास पोलीस हवालदार पाटील करत आहेत.

**शुक्रवारी जिल्हा नियोजन समितीची बैठक**

# आमदारांचे टार्गेट 'जलजीवन मिशन'वर राहणार?

**सुराज्य/सोलापूर**

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक शुक्रवार १३ जानेवारी रोजी सकाळी साडेअकरा वाजता नियोजन भवन या ठिकाणी बोलावण्यात आली आहे. या बैठकीमध्ये 'जलजीवन मिशन'वर सभागृहामध्ये पुन्हा होणार आहे.

पालकमंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या पहिल्या बैठकीनंतर सोलापूर जिल्ह्यातील विकास कामांची यादी फायनल करण्याचे अधिकार अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना देण्यात आले होते. दरम्यानच्या काळात ग्रामपंचायत निवडणुकींची आचारसंहिता लागल्याने विकास कामे होऊ शकले नाहीत पण आता निवडणुकींची आचारसंहिता संपली असून कामांना गती येण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या जलजीवन मिशन या योजनेत सर्वाधिक निधी असल्याने जिल्हा परिषदेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी या योजनेच्या कामांवर आपला फोकस ठेवलाय, सुट्टीच्या दिवसात ही त्यांनी या योजनेच्या कामांचा आढावा घेत कामाला गती दिल्याचे दिसून येते. यापूर्वी झालेल्या 'डीपीसी' बैठकीत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांची चौकशी लावण्यात आली होती.





मात्र त्याचा अहवालही अजून समोर आलेला नाही. त्यामुळे मधल्या काळात झालेल्या कामांचा आढावा या बैठकीत घेतला जाण्याची शक्यता आहे. एकूणच 'जलजीवन' यावेळीही आमदारांचे टार्गेट राहील अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.




## डॉ. मेतन फाउंडेशनच्या सांस्कृतिक कार्यक्रमात शीळ आणि गायनाचा उत्तम संगम

**सुराज्य/सोलापूर**

डॉ. मेतन फाउंडेशन आणि व्हि. मेतन क्रिएशन प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने बॉलीवूडमधील दिग्गज गायकांना श्रद्धांजली अर्पण करीत व्हिसलिंग अँड सिंगिंग अनमोल गीत हा अनोखा कार्यक्रम डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे शनिवारी पार पडला या शीळ आणि गायनाचा उत्तम संगम या सांस्कृतीक कार्याक्रामत पहावयास मिळाला

बॉलीवूड व मराठी सिनेसृष्टी त्यामधील जुनी, प्रसिद्ध व मधुर गीते शीळ आणि गायन यांचं उत्तम संगम घडवून सोलापुरातील रसिकांची मने जिंकली. या कार्यक्रमात मुंबईचे शिरीष जोशी व अपर्णा नाईक यांनी शीळ वाजवून तसेच सोलापूरचे जयंत पानसरे व मुंबईचे कुसुम गोड्रे यांनी आपल्या मधुर गायनातून रसिकांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निमिषा वालावलकर यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रकाश कासेगावकर यांनी ध्वनी, विलास हुमणे यांनी प्रकाश योजना, रघुनाथ नाईक आणि सोनू देवेंद्र यांनी स्टेज व्यवस्था केली. या कार्यक्रमासाठी सोलापुरातील रसिकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावून गायकांच्या प्रत्येक गाण्यास टाळ्या वाजवून उत्तम दाद दिली. कार्यक्रम पार पडल्यानंतर सर्व रसिकांनी या अनोख्या व्हिसलिंग अँड सिंगिंग अनमोल गीत कार्यक्रमाचे सर्व कलाकारांचे तोंडभरून कौतुक केले .डॉ. मेतन फाउंडेशन आणि व्हि. मेतन क्रिएशन प्रायव्हेट लिमिटेडच्यावतीने सांस्कृतिक कार्यक्रम क्षेत्रात पहिले पाऊल उचलले आहे.

नजीकच्या काळात सोलापुरातील रसिकांसाठी अनोखी व चांगले सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येईल असे डॉ. व्यंकटेश मेतन सांगितले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोमेश्वर लवंगे, चिदानंद मुस्तारे, महेश बनसोडे, प्रल्हाद कांबळे, श्रीनिवास मेतन, सिद्धाराम सक्करगी, बसवराज साखरे, श्रीनिवास येले, विद्या मनुरे, सीमा गंजाळे यांनी परिश्रम घेतले.

## मृत्यूस कारणीभूत; वीज मंडळातील कर्मचाऱ्यावर गुन्हा

**सोलापूर** : प्रभाकर नगर येथे विद्युतविभागाचे लाईटच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. यात शॉक बसून हेमन बंदेनवाज बिराजदार या ७ वर्षे मुलीचा मृत्यू झाला. या प्रकरणी महानगरपालिका कडील लाईट विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी बंदेनवाज पाशा बिराजदार (वय-३२, रा.प्रभाकर नगर मजरेवाडी) यांच्या घरासमोरील लाईट बंद होती. यावेळी फिर्यादीची मुलगी ही घराच्या अंगणात खांबाजवळ खेळत असताना विजेचा जोराचा धक्का बसून मुलगी ऐमन ही जाग्यावर मयत झाली. त्या लाईटच्या खांबाच्या दुरुस्तीचे काम महानगरपालिकेकडे विद्युत विभागाने करत असताना कामात निष्काळजीपणा केला. या प्रकरणातील दोषी कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल झाला असून, अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी हे करत आहेत.

